म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय चरित्र ना.
दा. क्र. ११५८८



# बुद्धदेव

☆

गोपीनाथ तळवलकर

IRBK-0105787
IRBK-0105787

प्रकाशन

किंमत दीड रुपया

# दोन शब्द

भगवान् गौतम बुद्धाचें हें लहानसें चरित्र बुद्धदेवाच्या २५०० व्या परिनिर्वाण दिनाच्या महोत्सवांत प्रसिद्ध होत आहे. प्रौढ विद्यार्थी आणि सामान्य भाविक वाचक यांना बुद्धदेवाच्या उदात्त जीवनाची व उपदेशाची तोंड ओळख करून द्यावी एवढाच हें चरित्र लिहिण्याचा उद्देश होय. थोर विभूतींच्या जीवनांतले दैवी चमत्कार बुद्धीला अगम्य किंवा अमान्य वाटले तरी त्यांतलें काव्य विलोभनीय असतें. शिवाय प्रतीकरूपानें त्यांत मनुष्याच्या मनःसृष्टींतल्या खळबळीच रंगविलेल्या असतात. म्हणून प्रस्तुत चरित्रांत चमत्कारांना संक्षेप दिलेला नाहीं. बुद्धदेवाचा अमृततुल्य उपदेश एके ठिकाणीं न सांगतां मधून मधून गुंफून दिला आहे. घटना आणि आख्यायिका यांचाच मुख्यतः उपयोग केला असल्यानें चरित्र कुठेंहि कंटाळवाणें होणार नाहीं अशी खात्री वाटते.

तथापि या पुस्तकाचें आगळें मोल म्हणजे त्याची सजावट. बुद्धदेवाच्या उदात्त जीवनाचें रहस्य सांगायला शब्द जेथें अपुरे पडतील तेथें सामर्थ्यवान् रेषा व रंग तें काम करायला या पुस्तकांत सज्ज आहेत. जावा, कांबोडिया, थायलँड, जपान, सीलोन वगैरे परदेशांतील बुद्धमूर्ति व शिल्प तसेंच भारतांतील अजंठा, सारनाथ वगैरे ठिकाणचे शिल्प व भित्तिचित्रें (Frescos) यांच्या आधारें श्री. ओके, श्री. माळी व श्री. सोवनी या कल्पक कलाकारांनीं या पुस्तकाची सजावट केली असल्यानें या पुस्तकाला एक अनन्यसाधारण कलात्मक व सांस्कृतिक महत्त्व आलें आहे. देशोदेशींच्या नागरिकांनीं आपापल्या मनानें कल्पिलेल्या बुद्धमूर्तींचें दर्शन येथें घडेल. बुद्धदेवाच्या चरित्रांतील प्रसंग पाहून मुग्ध होणार नाहीं असा वाचक विरळाच. दृष्टीला आल्हाद व मनाला उद्बोधन देणारी अशी ही कला आहे.

आधुनिक युगाला बौद्धधर्मासारखा विवेकाधिष्ठित व समतावादी धर्मच पटेल यांत शंका नाहीं. मानवानें अनेक शतकांच्या पर्वतप्राय परिश्रमांनीं उभारलेलें संस्कृति-मंदिर हिंसा व प्रतिस्पर्धा यांत उध्वस्त होण्याची वेळ आली आहे. अशा वेळीं बुद्धदेवाच्या उपदेशावांचून जगाला तारक असें दुसरें काय आहे ?

**गोपीनाथ तळवलकर**

---

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें.

सूचना :- खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ (८) नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
...नों. दि ...
वा. क्र. ... क्र. ...
कि. ...

चित्रशाळा प्रकाशन

IRBK-0105787

मु द्र क व प्र का श क
दा. त्र्यं. जोशी, बी. ए. (टिळक)
व्यवस्थापक, चित्रशाळा प्रेस,
१०२६, सदाशिव, पुणें २.

☆

●●● मुखपृष्ठ : चित्रकार श्री. शंतनु माळी, मुंबई.
पुढील बाजू : पद्मपाणी बोधिसत्त्व
: अजंठा लेण्यांतील चित्राची प्रतिकृति.
मागील बाजू : अजंठा येथील लेण्यांतील पहिल्या
गुंफेंतील छतावरील नक्षीकाम

●●● आंतील रंगीत चित्रें : श्री. म. वि. सोवनी, पुणें.
(१) पृष्ठ : १६ : गौतमाचा गृहत्याग.
प्रख्यात चित्रकार नंदलाल वसू
यांच्या एका चित्राची प्रतिकृति.
(२) पृष्ठ : ३६ : भिक्षेस निघालेला बुद्धदेव.
अजंठा येथील लेण्यांतील सतराव्या
गुंफेंतील एका चित्राची प्रतिकृति.

●●● चित्रकार श्री. व्ही. एन्. ओके, मुंबई.
पृष्ठ : ४० : मदुरा येथील बुद्धमूर्ति
पृष्ठ : ४८ : सतलजगंज येथील बुद्धमूर्ति
व आंतील सर्व रेखाचित्रें

☆

प्र थ मा वृ त्ति : २५ मे १९५६
२५०० वा बुद्ध महापरिनिर्वाण दिन

# दोन शब्द

भगवान् गौतम बुद्धाचें हें लहानसें चरित्र बुद्धदेवाच्या २५०० व्या परिनिर्वाण दिनाच्या महोत्सवांत प्रसिद्ध होत आहे. प्रौढ विद्यार्थी आणि सामान्य भाविक वाचक यांना बुद्धदेवाच्या उदात्त जीवनाची व उपदेशाची तोंड ओळख करून द्यावी एवढाच हें चरित्र लिहिण्याचा उद्देश होय. थोर विभूतींच्या जीवनांतले दैवी चमत्कार बुद्धीला अगम्य किंवा अमान्य वाटले तरी त्यांतलें काव्य विलोभनीय असतें. शिवाय प्रतीकरूपानें त्यांत मनुष्याच्या मन:सृष्टींतल्या खळबळीच रंगविलेल्या असतात. म्हणून प्रस्तुत चरित्रांत चमत्कारांना संक्षेप दिलेला नाहीं. बुद्धदेवाचा अमृततुल्य उपदेश एके ठिकाणीं न सांगतां मधून मधून गुंफून दिला आहे. घटना आणि आख्यायिका यांचाच मुख्यत: उपयोग केला असल्यानें चरित्र कुठेंहि कंटाळवाणें होणार नाहीं अशी खात्री वाटते.

तथापि या पुस्तकाचें आगळें मोल म्हणजे त्याची सजावट. बुद्धदेवाच्या उदात्त जीवनाचें रहस्य सांगायला शब्द जेथें अपुरे पडतील तेथें सामर्थ्यवान् रेषा व रंग तें काम करायला या पुस्तकांत सज्ज आहेत.जावा,कांबोडिया,थायलँड,जपान, सीलोन वगैरे परदेशांतील बुद्धमूर्ति व शिल्प तसेंच भारतांतील अजंठा, सारनाथ वगैरे ठिकाणचे शिल्प व भित्तिचित्रें (Frescos) यांच्या आधारें श्री. ओके, श्री. माळी व श्री. सोवनी या कल्पक कलाकारांनीं या पुस्तकाची सजावट केली असल्यानें या पुस्तकाला एक अनन्यसाधारण कलात्मक व सांस्कृतिक महत्त्व आलें आहे. देशोदेशींच्या नागरिकांनीं आपापल्या मनानें कल्पिलेल्या बुद्धमूर्तींचें दर्शन येथें घडेल. बुद्धदेवाच्या चरित्रांतील प्रसंग पाहून मुग्ध होणार नाहीं असा वाचक विरळाच. दृष्टीला आल्हाद व मनाला उद्बोधन देणारी अशी ही कला आहे.

आधुनिक युगाला बौद्धधर्मासारखा विवेकाधिष्ठित व समतावादी धर्मच पटेल यांत शंका नाहीं. मानवानें अनेक शतकांच्या पर्वतप्राय परिश्रमांनीं उभारलेलें संस्कृति-मंदिर हिंसा व प्रतिस्पर्धा यांत उध्वस्त होण्याची वेळ आली आहे. अशा वेळीं बुद्धदेवाच्या उपदेशावांचून जगाला तारक असें दुसरें काय आहे ?

**गोपीनाथ तळवलकर**

## अनुक्रम


१. जन्म व बालपण १

२. विवाह आणि विरक्ति ७

३. साक्षात्कार १७

४. बहुजनहिताय बहुजनसुखाय २५


५. दिनचर्या आणि उपदेश ३४

६. वैशिष्ट्यें आणि विरोध ४०

७. बुद्धदेवाचे पूर्वजन्म ४६

८. निर्वाण ५४

अनुक्रम
विभाग वा. वा.
क्रमांक 9054
नों. क्र. 39131



# १. जन्म व बालपण

बरोबर अडीच हजार वर्षें झालीं त्या गोष्टीला. वैशाखांतली पूर्णिमा होती. हिरवळीवर सोनेरी छटा चमकूं लागली. डोंगर किंचित थरारले. सारीं कमळें एकदम प्रफुल्ल झालीं. आणि भाविकांच्या कानावर असे शब्द आले—" उठा. उत्साह धरा. बुद्ध जन्माला येत आहे. " लोकांना नवी आशा वाटूं लागली.

याच वेळीं शुद्धोदन राजाची राणी मायादेवी बागेंत पलाशवृक्षाखालीं उभी होती. तिला नऊ मास पूर्ण झाले होते. मायादेवीच्या मुद्रेवर व अंगावर अपूर्व तेज चमकत होतें. तिला प्रसूतिवेदना सुरू झाल्या. लौकरच तिनें एका तेजस्वी पुत्राला जन्म दिला. हाच जगाला शांति-प्रेमाचा संदेश देणारा भगवान् गौतम बुद्ध. लतांनीं फुलें उधळलीं. स्वर्गांतून या बालकावर सुगंधित पाणी

शिंपडण्यांत आलें. राजाला ही वार्ता राजवाड्यात कळली. त्याचा आनंद गगनांत मावेना. मुलाला मोठ्या इतमामानें नेण्यासाठीं तो बागेंत आला. तों काय? बाळबाळंतिणीला पालखींत घालून चार भोई राजवाड्याकडे चालले होते! चार दिशांना चार संरक्षक देव असतात. तेच भोई होऊन आले होते. त्यांनीं माणसांचें रूप घेतल्यामुळें ते कुणाला ओळखूं आले नाहींत इतकेंच.

मुलगा जन्माला आला म्हणून राजानें मोठा उत्सव केला. लतापताकांनीं कपिलवस्तु नगरी शृंगारण्यांत आली. मैदानी खेळांचे आखाडे पडले. दीपपंक्ती झळकूं लागल्या. रस्त्यांवर गुलाबपाणी शिंपडण्यांत आलें. कलावंतांचे ताफे आले. चोहींकडे आनंदीआनंद झाला होता. हा उत्सव चालू असतांच कोणी एक तापसी राजवाड्यांत आला. त्याचें नांव असित. विरक्त होऊन तो अनेक वर्षें अरण्यांत रहात असे. बुद्धजन्माची वार्ता कळतांच तो राजवाड्याकडे तडक आला. शुद्धोदन आणि राणी माया यांनीं त्याला नमस्कार केला आणि पुत्ररत्नाला त्याच्या पायांवर माया ठेवूं लागली. तों असित मुनि एकदम म्हणाला, “छेः छेः या मुलाला माझ्या पायांवर ठेवूं नका. हा परमेश्वराचा अवतार आहे. यालाच मी वंदन करतों. शुद्धोदन राजा, युगानुयुगांनीं असें रत्न जन्माला येतें. हा मुलगा जगाला अपूर्व धर्मज्ञान देईल. पण मी त्याचें वैभव पाहण्यास जगणार नाहीं. याच्या दर्शनासाठींच मीं आजवर जीव ठेवला होता. माझी यात्रा संपली. मायादेवी, एवढ्या अलौकिक पुत्ररत्नाला जन्म देऊन तूं धन्य झाली आहेस. यापुढें तुला संसाराचा ताप सोसावा लागणार नाहीं. देव तुला सातव्याच दिवशीं स्वर्गांत घेऊन जातील.” आणि तसेंच झालें. सातव्या दिवशीं माया एकदां झोंपली ती कायमचीच! तिची बहीण महाप्रजावती गौतमी हिनें पुढें गौतमबुद्धाचा सांभाळ केला.

भारतांत त्या वेळीं एकाच अशा सार्वभौम राजाचा अंमल नव्हता. लहान लहान अशीं क्षत्रिय कुलांचीं राज्यें असत. गौतमाचें कुल शाक्य या नांवानें प्रसिद्ध होतें. आपण ज्याला आतां बिहार प्रांत म्हणतों त्याच्या उत्तरेस या

कुलाचें राज्य होतें. हे क्षत्रिय लोक धनुर्विद्या, राज्यकारभार यांत निष्णात असत. गौतमाबद्दल असें भविष्य वर्तविलें होतें कीं, हा एक मोठा संन्यासी तरी होईल किंवा चक्रवर्ती राजा होईल. राजा शुद्धोदनाला वाटे, गौतमानें चक्रवर्ती व्हावें, संन्यासी होऊं नये. म्हणून लहानपणापासून त्यानें गौतमाला ऐषारामांत ठेवलें. क्षत्रियांची विद्या त्याला शिकविली. गौतम जात्या फार तल्लख बुद्धीचा होता. भाषा, गणित,धर्मशास्त्र या विषयांत त्यानें झपाट्यानें प्रगति केली. गुरु शिकवीत तो धडा याला अगोदरच तोंडपाठ असावयाचा. त्याला घोड्यावरची मांड चांगली साधे.अचूक शरसंधान करण्यांत त्याचा हात कुणाला धरतां येईनासा झाला. अशा या गुणी राजपुत्रावर सारी प्रजा मोहित झाल्यास नवल तें काय ?

गौतमाला दुःख कसें तें ठाऊक नव्हतें. पण एक दिवस मात्र त्याची सुखाची तंद्री मोडली आणि दुःखाचा पहिला झटका त्याला बसला !



जावा येथील बुद्धमूर्ति

काय झालें ? गौतम आपल्या बागेंत बसून सृष्टीची शोभा पहात होता. आकाशांतून हंसांचा एक थवा पंखें मारीत मानस सरोवराच्या रोखानें चालला होता. आपल्या घरीं पोंचण्यास हे हंस फार उत्कण्ठित झाले होते. जोरजोरानें पंखें मारीत ते गाणेंहि गात होते. तो शब्द फार मधुर होता. हा सुंदर देखावा पाहण्यांत गौतम रमला. तों हाय ! हंसाच्या मोहोरक्याच्या पोटांत खालून सूं सूं करीत आलेला एक तीर घुसला ! दुःखानें चित्कार करीत तो हंस खालीं कोसळला; गौतमाच्या समोरच्या झुडपांत तो पडला. त्याची तडफड चालू होती. गौतमाला तें दृश्य भयंकर वाटलें. झटदिशीं जाऊन त्यानें त्या पक्ष्याला जवळ घेतलें आणि त्याच्या अंगांतला बाण बाहेर काढला. त्यानें तो आपल्या हाताला टोचून

पाहिला तों त्याला वेदना झाल्या ! हंसाच्या असह्य दुःखाची गौतमाला कल्पना आली. त्यानें हंसाच्या जखमेवर पाला बांधला. रक्त थांबविलें. हंसाला मांडीवर घेऊन तो कुरवाळीत बसला. तें भेदरलेलें व जखमी झालेलें पांखरूं जरा शांत झालें. इतक्यांत एक सेवक तेथें येऊन गौतमाला म्हणाला, "महाराज, आपले चुलतबंधु कुमार देवदत्त यांनीं हा पक्षी मारलेला आहे. तो घेऊन येण्याची त्यांनीं मला आज्ञा केली आहे. मेहेरबानी करून तो पक्षी द्या." पण गौतमानें पक्षी देण्याचें साफ नाकारलें. त्यांचा वाद चालला आहे तों स्वतः देवदत्तच आला आणि गौतमाजवळ पक्षी मागूं लागला. या वेळीं गौतम कांहींसा स्तब्ध झाला. पण थोडा वेळच. नंतर त्याचा चेहरा एकदम उल्हसित झालेला दिसला. मोठ्या अधिकारवाणीनें गौतम सांगूं लागला—"नाहीं. देवदत्ता, हा पक्षी मी तुला देणार नाहीं. तो दुर्दैवानें मेला असता तर तुझ्या स्वाधीन केला असता; पण तो जिवंत आहे. मी त्याला वांचविणार आहे. प्राण घेणाऱ्यापेक्षां प्राण वांचविणाऱ्याचा हक्क जास्त आहे. मी दयेचा अधिकार सर्व जगावर गाजविणार आहें. दुःखीकष्टी पीडलेल्या प्राण्यांचें दुःख नाहींसें करण्याचा मी संकल्प सोडीत आहे. तो पुरा करण्यास या प्राण्याचे जीव वांचविण्यापासून मी सुरुवात करणार." पण गौतम निग्रही होता. तसाच समजूतदारहि होता. आपलें दोघांचें गाऱ्हाणें दरबारांत मांडूं आणि शहाणेसुर्ते लोक जो न्याय देतील तो पत्करूं असें त्यानें देवदत्ताला म्हटलें. देवदत्त कबूल झाला. तो जखमी पक्षी घेऊन गौतम देवदत्तासह दरबारांत आला. पंचांनीं दोन्ही राजपुत्रांचें म्हणणें ऐकून घेतलें आणि ते निकाल काय द्यावा याचा खल करूं लागले. कुणी गौतमाचें म्हणणें योग्य आहे असें म्हणत, तर कुणी देवदत्ताची बाजू उचलून धरीत. इतक्यांत एक तेजःपुंज साधु अकस्मात् तेथें प्रगट झाला आणि खड्या सुरांत म्हणाला, "दरबारी लोकांनो, राजपुत्र गौतमाचेंच म्हणणें बरोबर आहे. जीव घेणाऱ्यापेक्षां जीवदान करणारा मनुष्यच थोर. त्याचाच हक्क प्राण्यावर जास्त असतो. गौतमानें पक्ष्याला वांचविलें आहे. पक्षी त्यालाच मिळाला पाहिजे." सारी सभा चकित झाली. तो साधु आला तसाच निघून गेला. त्याला परत बोलावण्यासाठीं माणसें धावलीं. तो


साधु दिसेनासा झाला. एक नाग मात्र त्या वाटेनें सळसळत जात होता! गौतमाचा जय झाला. 'धन्य गौतम! धन्य सिद्धार्थ!' सभेंत घोष उठला.

गौतम जसा दयाशील तसाच बलवान् होता. कपिलवस्तु राजधानीच्या जवळून रोहिणी नदी वाहात असे. एकदां खूप मोठें वादळ झालें आणि कांठा-वरचा एक वृक्ष नदींत पडला. नदीला बांध पडल्यासारखें झालें आणि कांठा-वरचीं शेतें पाण्यांत बुडूं लागलीं. जवळच्या पुढच्या गांवांना पाणी मिळेना. गौतमाच्या हें लक्षांत आलें. तो रोहिणीच्या कांठीं गेला आणि त्यानें तो प्रचंड वृक्ष आपल्या सामर्थ्यवान् बाहूंनीं प्रवाहांतून बाहेर काढला. शेतांतलें पाणी ओसरलें आणि पुढल्या गांवांना पाणी मिळूं लागलें. लोक गौतमाला दुवा देऊं लागले. असलीं लोकोपयोगी कामें तो नेहमीं करी. लोक त्याला अधिकाधिक चाहूं लागले.

एकदां शुद्धोदन राजा गौतमाला म्हणाला, "बाळा, चल येतोस का? वनश्री कशी फुललेली आहे. या सुंदर राज्याचा मालक माझ्या मागून तूंच होणार. हें राज्य तूं स्वतः डोळ्यांखालीं घातलें पाहिजेस. आपण थोडी सहल करण्यास जाऊं." गौतम तयार झाला दोघेहि घोड्यावर बसून राजधानीबाहेर पडले. शेतें हिरवींगार पसरलेलीं; मोटेचें पाणी मधून झुळझुळतें आहे; निरनिराळे पक्षी किलबिल करीत हिंडत आहेत; विहिरींतून कबूतरांचा कुहूँ कुहूँ असा शब्द ऐकूं येत आहे. असा तो रमणीय देखावा पाहून गौतम उल्हासित झाला. दूर कुठल्या तरी खेड्यांत लग्नसमारंभ चालला होता. तेथून वाद्यांचे मंजुळ ध्वनि ऐकूं येत होते. सृष्टींत आनंदी आनंद भरून राहिला आहे असें क्षणभर गौतमाला वाटलें.

पण गौतमाचें मन उथळ नव्हतें, खोल होतें. हुरळणारें नव्हतें तर विचारी होतें. या सुंदर सृष्टीच्या मागें किती घोर संकटें दडलेलीं आहेत याचा अंदाज लौकरच त्याला आला. दुपारीं भर उन्हांत बैल राबत होते. पोटासाठीं खपणारा शेतकरी त्यांच्या मखमली पाठीवर आसूड मारीत होता. एकीकडे सरडा अधाशी-

पणें मुंग्यांना गिळून टाकीत होता. तों मागून साप येऊन त्यानें सरड्याचें नरडें पकडलें! वर एक घार घिरट्या घालीत होती. ती झपाट्यानें खालीं उतरली आणि तिनें सापाला उचलून नेलें. इतक्यांत तिच्या उरांत पारध्याचा बाण बसला!! गौतमाला असें आढळून आलें कीं, आपल्यापेक्षां दुर्बळ प्राण्याचा घास गिळावा आणि अखेर आपल्यापेक्षां बलिष्ठ प्राण्याच्या हल्ल्याला बळी पडावें हाच जगाचा क्रूर नियम आहे. त्याचा सारा उल्हास मावळला. तो उद्वेगानें म्हणाला, "हीच का ती आनंदी आणि रम्य सृष्टि! बळवंतानें दुबळ्याचा फडशा पाडावा हा एकच कायदा येथें दिसतो. गरिबांची भाकरी डोळ्यांच्या पाण्यांनीं खारावली आहे. जमिनीवर, अंतराळीं, पाण्यांत कुठेंहि दुबळ्यांना आसरा नाहीं. हा जीवनसंग्राम फार भयंकर आहे." राजा आणि त्याचा परिवार यांना बाजूला सोडून गौतम जंबुवृक्षाखालीं जाऊन बसला. त्यानें डोळे मिटले. क्षणभर त्याची समाधि लागली. त्याच वेळीं अंतराळांतून देवदूत जात होते. त्यांनीं गौतमाकडे पाहिलें आणि म्हटलें, "हाच देवाचा नवा अवतार. हा जगाला परमपदाचा मार्ग शिकवील." असें म्हणून पंख हलवीत ते निघून गेले. कांहीं वेळानें गौतमानें डोळे उघडले तेव्हां एका अपूर्व आनंदाचा साक्षात्कार त्याला झाल्यासारखें वाटलें. अंधार पडूं लागला होता. त्यानें घोड्यावर टांग टाकली आणि तो राजधानीस परतला.






## २. विवाह आणि विरक्ति

शुद्धोदन राजानें मुलाला तीन मोठाले राजवाडे बांधून दिले होते. उन्हाळा, पावसाळा आणि हिंवाळा या तीन काळांसाठीं हे तीन राजवाडे होते.म्हणजे तशा तऱ्हेच्या सुखसोयी त्या राजवाड्यांत होत्या.मुलाचें यत्किंचित् उणें पडूं नये याची शुद्धोदन अहोरात्र काळजी घेत असे.पण अशा ऐषारामांत राहूनहि गौतम फारसा आनंदी नव्हता. एखाद्या स्वच्छ सरोवरावर ढगाची सावली पडावी त्याप्रमाणें त्याच्या सुंदर मुद्रेवर कधीं कधीं उदासीनपणाची छाया दिसे. शुद्धोदन यामुळें फार अस्वस्थ होई. आपला मुलगा सर्व वैभव सोडून संन्यासाचा मार्ग धरणार नाहीं ना असें भय त्याला वाटे. अखेर त्यानें आपली चिंता आपल्या मंत्रिमंडळापुढें मांडली. तो म्हणाला, “ माझा पुत्र गौतम वैभवाच्या आगरांत असून उदास असतो. मंत्रीजनहो, मला भीति वाटते कीं एक दिवस तो राज्याचा त्याग करून संन्यास घेईल. असें न व्हावें, त्याचें मन संसारांत आणि ऐश्वर्यांत रमावें यासाठीं

मी काय करूं ? तुम्ही अनुभवी, जाणते, चतुर लोक आहां. मला या कामीं कांहीं बिनतोड उपाय सांगा.” मंत्री विचारांत पडले. मग एक वृद्ध अमात्य उठून म्हणाला, “महाराज, यावर एक तोड आहे. स्त्रीप्रेम. एखादी गुणी आणि देखणी स्त्री गौतमाला खात्रीनें संसारांत रमवूं शकेल.” सर्वांना हें पटलें. पण हें घडावें कसें ? शेवटीं असें ठरलें कीं शाक्य लोकांच्या रीतिरिवाजास अनुसरून एक सौंदर्योत्सव भरवावा. कपिलवस्तु राजधानींतल्या सुंदर सुंदर मुलींना गौतमाच्या शुभहस्तें बक्षिसें देण्यांत येतील असें जाहीर करावें. त्यामधून सर्वांत सुंदर असेल ती गौतमाची पत्नी म्हणून त्याचा कल पाहून निवडतां येईल.



कांबोडिया येथील बुद्धमूर्ति

दवंडी पिटविण्यांत आली आणि सौंदर्योत्सव सुरू झाला. मध्यभागीं गौतमाला बसविण्यांत आलें होतें. राजधानींतल्या एकाहून एक देखण्या मुली तेथें जमल्या होत्या. डोळ्यांत सुरमा, हातापायांना मेंदी, कुंकवावर तारका, कपाळावर बिंदी अशा त्या शाक्ययुवती विजेसारख्या लखलखत होत्या. गौतमाच्या हातून बक्षीस मिळालें कीं एखादी मुलगी हरिणीसारखी घावरत झटकन् आपल्या मैत्रिणींत जाऊन बसे. कुणी धीटपणें हसत हसत लोकांच्या टाळ्यांचा स्वीकार करी. सर्व बक्षिसें वांटून झालीं. इतक्यांत एक लावण्यमयी एकदम पुढें आली आणि किंचित् स्मित करून गौतमाला म्हणाली, “माझ्याकरितां कांहींच राहिलं नाहीं वाटतं ?” गौतम एकदम मोहित होऊन उठला. दोन पावलें पुढें सरकला आणि प्रेमळ स्वरांत तिला म्हणाला, “सर्व बक्षिसें संपलीं. आतां ही बहुमोल देणगी मी तुला देत आहें, ती स्वीकार.” असें म्हणून गौतमानें आपल्या गळ्यांतली रत्नमाला काढली आणि तिच्या गळ्यांत घातली.

ही मुलगी दुसरी कोणी नसून राजकुमारी यशोधरा होती. तिला पाहिल्या-बरोबर गौतमाला जणूं मागील जन्माचा ऋणानुबंध आठवला. गौतमाची निवड होऊन चुकली. शुद्धोदन राजाला आनंद झाला. ही रूपगुणवती मुलगी आतां आपल्या मुलाचें मन संसारांत रमवील अशी आशा त्याला वाटूं लागली. तो आनंदानें म्हणाला, "यशोधरेच्या पित्याला निरोप पाठवा. त्याला सांगा तुमची मुलगी गौतमानें पसंत केली आहे. आतां पुढचीं बोलणीं करण्यास समारंभानें यावें." आणि गौतमाच्या विवाहाची तयारी करण्याविषयीं त्यानें लगेच फर्मानें सोडलीं.

पण एक अडचण उभी राहिली. यशोधरेच्या पित्याला शुद्धोदन राजाचा निरोप पोंचला तेव्हां तो म्हणाला, "यशोधरा गौतमाला देण्यास माझी मुळींच हरकत नाहीं. आनंदच आहे मला. पण क्षत्रियास योग्य अशा पद्धतीनें हें झालें पाहिजे. अश्वारोहण, शरसंधान यांत गौतमानें इतर राजपुत्रांपेक्षां अधिक कौशल्य दाखविलें पाहिजे. तरच त्याला यशोधरा माळ घालील." शुद्धोदनाला हें कळल्यावर तो दुःखी झाला. गौतम धर्मशील होता, विद्वान् होता. पण धनुर्विद्या वगैरे कामीं त्याचें फारसें लक्ष नव्हतें. घोड्याला दम लागेल म्हणून गौतम त्याला कधीं दामटत नसे. समोरून वायुवेगानें चाललेल्या काळविटावर धरलेला नेम तो दयाबुद्धीनें सोडून देई. असा हा गौतम इतर राजपुत्रांना घोड्याच्या शर्यतींत व नेमबाजींत हरविणार कसा? अशी काळजी शुद्धोदनाला पडली.

यशोधराहि मनांतून सचिंत झाली. पण गौतमानें सर्वांचें समाधान केलें आणि शर्यतीच्या मैदानावर तो आला. तयारी अगोदरच झाली होती. नंद, देवदत्त असे खंदे राजपुत्र गौतमाचा पाडाव करायला मोठ्या ईर्षेनें आले होते. पण अखेर गौतम शर्यतींत पहिला आला. शरचापल्यांत त्यानें सर्वांना मागें टाकलें. हजारों लोकांनीं आनंदानें गौतमाचा जयजयकार केला. यशोधरेनें सलज्ज व आनंदित मुद्रेनें पुढें होऊन गौतमाच्या गळ्यांत पुष्पमाला घातली.

शुद्धोदनाचें हृदय आनंदानें व अभिमानानें भरून गेलें. मुलाला कुठें ठेवूं आणि कुठें नाहीं असें त्याला होऊन गेलें असल्यास नवल कसलें? विवाह-

समारंभ फारच थाटानें झाला. शुद्धोदनानें गौतमाला इंद्राच्या प्रासादासारखा एक राजवाडा बांधून दिला. येथें स्वर्गाचीं सारीं सुखें होतीं असें म्हटलें तरी चालेल. शहराचा कोलाहल किंवा रानांतली कोल्हेकुई येथें ऐकूं येत नसे. ठायीं ठायीं कारंजीं होतीं. त्यांतून सुगंधित पाण्याचे फवारे उडत. मखमलीचे पडदे चोहींकडे लावलेले असत. अहोरात्र गाण्याचे सुस्वर व पैंजणाचे नाद तेथें कानांवर पडत. मोर, पोपट, सारस यांच्या मधुर शब्दांनीं भोंवतालचें वातावरण भरून गेलेलें असे. दररोज दिवाळीसारखी रोषणाई केलेली असे. शुद्धोदनाला सारखें भय वाटे कीं गौतम मनानें हळवा आहे, दुःखदैन्याचें ओझरतें दर्शन जरी त्याला झालें तरी तो सर्वस्व सोडून देईल; म्हणून त्यानें गौतमाच्या राजवाड्यांत आनंदाचा बिघाड करणारें कुठलेंहि दृश्य दिसूं नये अशी सक्त ताकीद देऊन ठेवली होती. दासदासी सर्व सुंदर, निरोगी, तरुण अशाच ठेवल्या होत्या. कुणी आजारी पडलें कीं लगेच त्याला तेथून हलवीत. पक्ष्यांविषयीं सुद्धां हीच दक्षता घेतली जाई. गौतमाच्या राजवाड्यांत खुड्रुक झालेले पक्षी औषधाला दिसत नसत. फार काय, झाडांचीं जीर्ण पानें, पाचोळा, शुष्क झालेलीं फुलें हीं सुद्धां पहाटेपूर्वी सेवक तेथून गोळा करून दूर दृष्टीआड नेऊन टाकीत. गौतम दृष्टि टाकील तिकडे त्याला सारें सुंदर, टवटवीत, निरोगी, आनंदी असेंच दिसावें अशी अहोरात्र व्यवस्था केली जाई. अशा त्या स्वर्गीय वातावरणांत आपल्या प्रेमळ व लावण्य-मयी पत्नीसह गौतम सुखानें राहात होता.

पण हें सुख लौकरच संपणार असें दिसूं लागलें. एक दिवस दुपारीं गौतम आपल्या महालांत पलंगावर पडला होता. यशोधरा त्याला वारा घालीत होती. जवळ मोठी वीणा पडली होती. गौतमाच्या डोळ्यांवर किंचित् झोंपेची गुंगी आली. पण झोंप मात्र लागेना. इतक्यांत खिडकींतून येणाऱ्या वाऱ्याच्या लहरीनें वीणेच्या तारा कंपित झाल्या. अगदीं मंद पण स्पष्ट असे शब्द गौतमाला ऐकूं येऊं लागले.

"गौतमा, ऊठ. दुःखीकष्टी जग तुझी वाट पाहात आहे. आम्ही वाऱ्याचे निःश्वास आहोंत. जगभर विश्रांतीसाठीं हिंडलों. पण कुठें स्वस्थताच वाटत नाहीं.

बुद्धदेव

* * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * *

जगांतलें सुख म्हणजे नुसती छाया ! हुंदके, अश्रु, उसासे, आक्रोश यांनींच जग भरलेलें आहे. या जगाला शांततेचा मार्ग तूं दाखविला पाहिजेस. तूं सुखांत लोळत राहिलास तर जगाची चिंता दूर कोण करणार ? हे मायासुता, जग तुझी वाट पाहात आहे. ऊठ, सिद्धार्था, ऊठ."

गौतमाच्या डोळ्यावरली झोंप साफ उडाली. तो खडबडून जागा झाला. उठून बसला. आपले पतिदेव असे अस्वस्थ कां झाले हें यशोधरेला कळेना. तिनें त्याला खोदखोदून विचारलें. 'पण कांहीं नाहीं !' एवढेंच सांगून तो विचारमग्न होऊन बसला.

आणि त्याचें मन खवळून उठलें. या राजवाड्याच्या पलीकडे जें अफाट जग आहे तें आपण पाहिलेंच पाहिजे असें त्याला वाटूं लागलें. गौतमाची इच्छा राजाला कळविण्यांत आली. राजा म्हणाला, 'ठीक आहे. रथ सिद्ध करा. गौतमाला राजधानींत फिरूं द्या.' राजपुत्र नगरसंचार करणार असें जाहीर झालें. राजानें फर्माविलें कीं, 'कुठें घाण, कचरा दिसतां कामा नये. रोगी, पंगु, म्हातारे यांनीं तर राजपुत्राच्या दृष्टीस पडतां कामा नये.' राजाचा हुकूम तो ! लागलीच त्याप्रमाणें व्यवस्था करण्यांत आली. युवराज येणार म्हणून जिकडे-तिकडे घरें शृंगारण्यांत आलीं. सड्या-रांगोळ्यांनीं शहराला देवघराचें आगळें सौंदर्य आलें. सज्जांतून फुलें घेऊन स्त्रिया उभ्या राहिल्या. आपला आवडता राजपुत्र केव्हां येतो आणि आपण त्याला डोळे भरून केव्हां पाहतों असें त्यांना झालें होतें.

गौतम ठरलेल्या वेळीं शृंगारलेल्या भव्य रथांतून बसून नगरांत शिरला. 'युवराज गौतमाचा जयजयकार असो.' असा सारखा घोष सुरू होता. कुणी त्याच्याजवळ जाऊन त्याला वंदन करीत. कुणी त्याला फुलें देत. पौरजनांच्या प्रेमानें गौतम अगदीं गांगरून गोंधळून गेला. तो म्हणाला, "किती सुंदर जग आहे हें ! हीं साधीं भाविक माणसें; या प्रेमळ कष्टाळू भगिनी ! मी यांच्यासाठीं काय केलं म्हणून हीं माणसें माझ्यावर प्रेम करतात ! यांच्या गरजा किती थोड्या

आहेत ! आणि तरीहि यांच्या जीवनांत आनंद भरून वोसंडत आहे. अरे, त्या मुलाला माझ्याजवळ बसूं द्या." त्यानें सेवकांना सांगून एका गरीब मुलास रथांत घेतलें. गौतमाचा जयजयकार चारहि दिशांत घुमला.

रथ कांहींसा पुढें गेला. इतक्यांत एका घरामागून एक म्हातारा भिकारी पुढें आला. त्याच्या सर्वांगावर सुरकुत्या होत्या. मान वाकलेली, डोळे खोल गेलेले, पोट पाठीस लागलेलें, कातडी काळीकुट्ट झालेली असा तो भिकारी आपला जीर्ण हात पसरून केविलवाण्या स्वरांत म्हणाला, "मायबाप, उपाशी आहें मी. मरायला टेकलोंय्. एक पैसा द्या पोटाला." गौतम त्याला पाहून दचकला आणि सारथ्याला म्हणाला, "कोण रे हा ? आणि मरायला टेकलोंय् म्हणतो आहे याचा अर्थ काय ?" सारथी म्हणाला, "महाराज, हा ऐंशी वर्षांचा म्हातारा आहे. पन्नाससाठ वर्षांपूर्वी हा चांगला बळकट, उमदा, ताठ होता. पण आतां या दिव्यांतलें तेल संपत आलें आहे. वात कशीतरी मंद जळते आहे. असं असतं हें म्हातारपण ! कांहीं दिवसांनीं हा जाणार." अधीरपणें गौतमानें विचारलें, "मलाहि ही दशा येईल का रे ? यशोधराहि अशी कधीं काळीं होईल कीं काय ?" सारथी म्हणाला, "महाराज, आपण आणि युवराज्ञी साहेब, इतकीं वर्षें वांचलां तर आपणांलाहि ही स्थिति येईल. या अवस्थेंतून कुणी सुटत नाहीं." "चल, रथ आपल्या राजवाड्याकडे ने." गौतम ओरडला. आणि सारथ्यानें तडक रथ गौतमाच्या राजवाड्याकडे नेला. मोठ्या उल्हसित मुद्रेनें गेलेला पति इतका दुःखीकष्टी होऊन कां परतला आहे, याचा यशोधरेला बोध होईना ! शुद्धोदनाला हें वृत्त कळलें. त्याला चैन पडेना. त्याची सारी रात्र दुःस्वप्नांनीं घेरून टाकली.

गौतमाला आतां खऱ्या जगाची कल्पना येऊं लागली होती. आपल्या राजवाड्यांत उभी केलेली सुखाची सृष्टि ही कृत्रिम आहे, क्षणभंगुर आहे, हें ज्ञान त्याला होऊं लागलें. पुनः नगरसंचार करण्याचा हट्ट त्यानें धरला. या वेळीं तर राजशाही थाटानें न जातां साध्या वेषांत सध्या स्वारीनिशीं जायचा त्याचा

निर्धार होता. राजाचा इलाज राहिला नाहीं. त्यानें गौतमाला शहरांत एकटेंच संचार करण्याची परवानगी दिली. गौतम बरोबर फक्त आपला विश्वासू सारथी घेऊन शहरांत आला. रस्त्यांत माणसें रेंगाळत चाललीं होतीं. पाठशाळांतून मुलांचा गोंगाट ऐकूं येत होता. भांड्यांच्या दुकानांतून ठण् ठण् असा आवाज येत होता. कुठें गारोडी पुंगी वाजवून नागाला डोलवीत होता आणि तें पाहण्यासाठीं भोंवतीं माणसांचें कडें पडलें होतें. नवस फेडण्यासाठीं स्त्रिया देवळाकडे जात होत्या. देवळच्या नगारखान्यांत चौघडा वाजत होता.

हा सारा देखावा पाहात पाहात गौतम चालला असतां एके ठिकाणीं कण्हण्याचा आवाज त्याला ऐकूं आला. एक दुखणेकरी माणूस रडत विव्हळत रस्त्याच्या कडेला पडला होता. कसल्यातरी दुर्धर दुखण्यानें त्याला पछाडलें होतें. हाडांचा सापळा झाला होता त्याचा ! ‘ मला उठवा, घरीं जाईपर्यंत कांहीं मीं जगत नाहीं. ’ तो माणूस येणाऱ्याजाणाऱ्याला विनवीत होता. गौतमानें तें पाहिलें, तेव्हां त्याच्या अंगावर कांटा उभा राहिला. त्यानें सारथ्याला विचारलें, “ काय झालें आहे रे याला ? ” सारथी म्हणाला, “ युवराज, याला भयंकर रोग झाला आहे. एका काळीं याच्या शरिरांत रक्तप्रवाह जोरानें वाहात होता. आतां तो आटत आला आहे. ” मध्येंच गौतमानें विचारलें, “ रोग सर्वांना होतात का ? मला किंवा यशोधरेलासुद्धां रोग होऊं शकेल ? ” सारथी म्हणाला, “ महाराज, जन्माला आलेल्या माणसाला रोग व्हायचाच. यांतून कोणी सुटलेला नाहीं. ” गौतम विचारमग्न झाला. इतक्यांत समोरून एक प्रेतयात्रा येतांना दिसली. ‘ राम बोलो भाई राम ’ असा घोष प्रेतवाहक करीत होते. मृत माणसांचे आप्तजन आक्रोश करीत बरोबर चालले होते. गौतमानें सारथ्याला विचारलें, “ काय रे चाललें आहे हें ? ” “ महाराज, हा मनुष्य मृत झाला आहे. ” “ म्हणजे ? ” “ याचें आयुष्य संपलें. आतां हा आपल्या आप्तांना, मित्रांना पुनः कधींहि दिसणार नाहीं. आणि म्हणूनच ते शोक करीत आहेत. ” गौतम यावर म्हणाला, “ मी, राजा, किंवा यशोधरा यांनाहि मरण येईल का

असें ? " सारथ्यानें तत्काळ उत्तर केलें, " महाराज, जन्माला आलेला कुठलाहि प्राणी मरायचाच. मरण कुणाला टळलें आहे वरें ! "

आतां मात्र गौतमाच्या डोक्यांत लख्ख प्रकाश पडला. म्हातारपण, रोग, मरण हें जगांत कुणालाहि टाळतां येत नाहीं, याची त्याला खात्री पटली. संसाराविषयीं त्याची सारी आसक्ति पार मावळली. तो सारथ्याला म्हणाला, " चल. आपल्या राजवाड्याकडे जाऊं. पुरें झालें हें जग पाहणें ! व्याधि, जरा आणि मृत्यु यांच्या तडाख्यांत सारी मानवजात सांपडली आहे. देवहि यावर कांहीं इलाज करूं शकत नाहींत. कदाचित् त्यांनाहि कांहीं करतां येत नसेल. आणखी पन्नास साठ वर्षांनीं हें माझें सुंदर शरीर म्हाताऱ्याप्रमाणें वाकणार ना ? मग या नश्वर सौंदर्याकरितां कशाला नसत्या उपाधि लावून घ्यायच्या ? सुखाचा शेवट दुःखांत, तारुण्याचा शेवट म्हातारपणांत व्हायचा. आणि सर्वांच्या अखेरीस मरण ! " बुद्धाचें डोकें भ्रमण करूं लागलें.

संसार सोडण्याचा विचार आतां त्यानें कायम केला. इतक्यांत यशोधरेनें एका सुंदर पुत्ररत्नाला जन्म दिल्याची वार्ता त्याला एका सेवकानें येऊन सांगितली. संसारांत हा नवाच पाश निर्माण झाला, आतां दिरंगाई करण्यांत अर्थ नाहीं, असें बुद्धानें ठरविलें. मुलाचें नांव ' राहुल ' असें ठेवण्यास त्यानें सांगितलें. ' राहुल ' याचा अर्थ शृंखला. पण ही शृंखला पायांत अधिक घट्ट बसण्यापूर्वींच गौतम संसार सोडून जाणार होता.

रात्र पडली. जिकडे तिकडे सामसूम झालें. गौतम यशोधरेच्या महालांत आला. यशोधरेला झोंप लागली होती. सुगंधित तेलानें जळणारे दिवे मंद झाले होते. यशोधरेच्या मुखमंडलावर अवर्णनीय असा आनंद दिसत होता. तिच्याजवळ चिमुकला राहुल झोंपला होता. तो देखावा अतिशय आकर्षक दिसत होता. क्षणभर गौतमाचें मन त्यांत रमलें. क्षणभरच तेथून हलूं नये असें त्याला वाटलें. पण लगेच त्यानें आपणांला सावरलें. दृढ निश्चयानें तो म्हणाला, ' माझ्या वैराग्याचा हाच समय आहे. कठोर वज्र, कुऱ्हाडीचे घाव, प्रचंड दगड, किंवा वितळलेलें लोखंड जरी माझ्या डोक्यावर कोसळलें तरी माझा निश्चय ढळणार

नाहीं. हीन, दीन, पंगु जगाच्या किंकाळ्या मला ऐकूं येत आहेत. हें सारें वैभव आणि मायापाश सोडून मला संन्याशाचीं वस्त्रें आणि दारिद्र्य यांचा अंगीकार केलाच पाहिजे. ”

आपल्याबरोबर गौतमानें कुणाला घेतलें नाहीं. त्याचा विश्वासू सारथी काय तो त्याच्याबरोबर होता. रात्रीची वेळ. गौतमाच्या घोड्याच्या टापा वाजूं नयेत म्हणून देवांनीं फुलें अंथरलीं होतीं. नगराच्या वेशीचे लोखंडी दरवाजे या वेळीं नेहमीं घट्ट लागलेले असायचे, आणि राजाच्या आज्ञेशिवाय कुणालाहि आंत बाहेर जातां येत नसे. पण गौतम वेशीजवळ जातांच अडसर आपोआप दूर झाले ! गौतम सारथ्यासह बाहेर पडला.

राज्याची हद्द ओलांडीपर्यंत सारथी गौतमाबरोबर होता. मग गौतमानें त्याला सांगितलें, “ आतां तूं परत जा. तूं माझें मोठें काम केलेंस म्हणून माझी ही बक्षिसी घे. ” गौतमानें त्याला गळ्यांतली बहुमोल माला दिली. सारथी




गौतम आपला सारथी व घोडा यास निरोप देत आहे. (बोरोबुदूर-जावा )




गौतमानें आपले केस कापून टाकले व साधे कपडे घातले. (बोरोबुदूर-जावा)

डोळ्यांत आसवें आणून म्हणाला, “ महाराज, घरीं परत चला. आपले पिताजी, मातुःश्री, राणीसाहेब आपली वाट पाहतील. त्यांच्या दुःखाचा विचार आपण केला नाहीं काय ? ” गौतम म्हणाला, “ अरे, मी साऱ्या जगाचेंच दुःख नाहींसें करणार आहें. त्यांत त्यांच्याहि दुःखाचा विनाश होईलच. ” सारथ्याचा नाइलाज झाला. आणि तो राजधानीस परत फिरला. गौतमानें आपले केस कापून टाकले. आपलीं भरजरी रेशमी राजवस्त्रें भिकाऱ्यास देऊन त्यांच्याकडून साधे कपडे घेतले. आणि म्हातारपण, मृत्यु, रोग यांच्यांतून मुक्त होण्याचा मार्ग शोधण्यास तो निघाला.





★ ★
गौतमाचा
गृहत्याग
★ ★



# ३. साक्षात्कार

गौतम फिरत फिरत वैशाली नगरीस आला. मोक्षाची इच्छा तीव्र झाली. सारा संसार सोडला. पण कुणी गुरु तर पाहिजे. गुरूवांचून धर्माचें ज्ञान कसें होणार! गौतमाला असें समजलें कीं, आलारकालम नांवाचा कुणी विरक्त ब्राह्मण, मुक्तीचा मार्ग दाखवीत असून वैशाली नगरींतच तो आहे. गौतमानें त्याच्यापुढें लोटांगण घातलें आणि त्याचें शिष्यत्व पत्करलें. पण त्याच्या घरीं राहून गौतमाला पाहिजे ती शांति मिळण्याचीं चिन्हें दिसेनात. त्यानें गुरुगृहास रामराम ठोकला आणि पांडवपर्वतानजीक तो येऊन राहिला.

मगध देशची राजधानी राजगृह येथून जवळच होती. गौतम राजगृहांत भिक्षा मागायला जाई आणि वस्तीला पर्वताजवळ येई. या विरक्त तरुण मुनीची

कीर्ति लगेच सर्वत्र पसरली. मगधाचा राजा बिंबिसार याच्या कानापर्यंत ती गेली. बिंबिसार राजा गौतमाच्या दर्शनास आला. तो म्हणाला, " महाराज, आपलें वय अगदीं कोवळें आहे. आपण मोठ्या कुलांतले दिसतां. आपल्या हातीं हा भिक्षेचा कटोरा शोभत नाहीं. सत्ता आणि धन या गोष्टी भयंकर खऱ्या, पण विचारानें त्यांचा उपयोग केला तर आपलें आणि जगाचें कल्याण होतें. मी आपल्या पायावर त्या घालण्यास तयार आहे. मला मूलबाळ नाहीं. माझा राजदंड आपण हातीं घ्यावा." यावर गौतम हसला आणि बिंबिसाराला म्हणाला, " राजा, तूं जें देऊं केलेंस तें माझ्याजवळ नव्हतें असें का तुला वाटतें ? मी थोर शाक्यकुलांत जन्माला आलों. माझा पिता मला हवें तें देऊं शकत होता. पण मी स्वतः होऊनच सर्वांचा त्याग केला. संपत्ति चंचल आहे. तृष्णेला अंत नाहीं. तिची तृप्ति करावी तर ती वाढतच जाते. सत्ता म्हटली कीं अहोरात्र काळजी आलीच. म्हणून हें सर्व सोडून मीं हा मार्ग पत्करला. दुःखापासून मुक्ति कधीं मिळेल हें शोधून काढणें माझें ध्येय आहे."यावर राजा काय बोलणार ? तो गौतमाला वंदन करून निघाला. धर्माचा साक्षात्कार झाल्यानंतर परत गौतमानें आपल्या राजधानीस भेट द्यावी अशी त्यानें गौतमाला विनंती केली. ती गौतमानें मान्य केली.

राजगृहांत उद्रक नांवाचा एक ज्ञानी पुरुष राहात असे. गौतमानें त्याला गुरु केलें. पण तोहि गौतमाला अपुरा वाटूं लागला. तो गयाशीर्ष पर्वतावर गेला. निबिड अरण्य होतें. मनुष्यवस्ती तेथें नव्हती. तेथें कांहीं दिवस घालवून तो नैरंजना नदीच्या कांठीं आला. येथें पांच भिक्षु तपश्चर्या करीत होते. गौतमानें या ठिकाणीं आपला देह शक्य तेवढा झिजवून अमर आनंदाची प्राप्ति करून घेण्यासाठीं घोर साधना आरंभिली. एका वृक्षाखालीं तो ध्यानधारणा करून बसून राहिला. जसजसे दिवस जाऊं लागले, तसतसें त्याचें शरीर वाळत चाललें. त्याच्या सुंदर देहाला सांपळ्याचें स्वरूप आलें. त्याला जागचें हलवेना. खोल आडांत तारकांचीं प्रतिबिंबें दिसावींत तद्वत् त्याचे डोळे दिसूं लागले. पोटाला

हात लावावा तों पाठीचा कणा हाताला लागे! पाठीचा कणा चाचपावा तों पोटाचें चामडें चिमटींत येई! त्याच्या डोळ्यांत प्राण आले! अखेर त्याला मूर्च्छा आली. जवळच तपश्चर्या करणारे ते पांच भिक्षु तर समजले कीं, सारा कारभार आटोपलाच! पण गौतम शुद्धीवर आला आणि विचार करूं लागला, "सहा वर्षें मीं तपश्चर्येंत घालविलीं. जीवनाचा अर्थ शोधून काढण्याचा प्रयत्न केला. शरीराचे हाल करून तो अर्थ कांहीं सांपडत नाहीं. उपास तापास करून स्वर्गांतलें सुख मिळतें असें पुष्कळ जण समजतात. पण तें सुख तरी कायमचें कुठें आहे? पुण्य संपलें कीं स्वर्गांतून हकालपटी होणार! मला तर कधीं न संपणारा आनंद पाहिजे. त्यासाठीं मी शोध करणार. दुय्यम दर्ज्याच्या सुखानें माझें कधींच समाधान व्हायचें नाहीं."



गौतम नैरंजना नदीच्या कांठीं आला. (बोरोबुदूर-जावा)

गौतमाला हलवत नव्हतें. झाडाच्या बुंध्याला टेकून तो तसाच स्वस्थ बसला. त्याचें शरीर अगदीं सुकून झडून गेलें होतें. तरी त्याच्या चेहऱ्याभोंवतीं विलक्षण प्रकाश दिसत होता. मौज काय झाली कीं त्या गांवच्या पाटलाची मुलगी सुजाता तेथें नवस फेडायला आली. गौतम बसला होता त्या झाडांत कोणी देवता राहते अशी त्या गांवांत समजूत होती. या वृक्षदेवतेला सुजातानें नवस केला होता कीं आपल्या आवडत्या माणसाशीं आपलें लग्न व्हावें आणि पहिला मुलगा व्हावा. सुजाताची इच्छा देवतेनें पूर्ण केली. तेव्हां ती नवस फेडण्यास तेथें आली होती. तिनें उत्तम वस्त्रें व अलंकार अंगावर घातले होते. सोन्याचा वाडगा भरून खीर तिनें बरोबर आणली होती. बरोबर दासी होती. लांबूनच




तपश्चर्या करीत असलेला गौतम (गांधार)

गौतम दासीच्या दृष्टीस पडला. ती सुजाताला म्हणाली, "ताईसाहेब, तुमचा नैवेद्य घेण्यासाठीं प्रत्यक्ष देवच वाट पाहात बसला आहे पाहा." खरोखर क्षीण झालेला गौतम एखाद्या देवासारखा तेजःपुंज दिसत होता. जवळ जाऊन सुजातानें त्याला नमस्कार केला आणि खिरीचा वाडगा त्याच्यापुढें ठेवला. अनेक दिवसांच्या उपासामुळें गौतमाला भयंकर भूक लागली होती. त्यानें गटागटा ती गोड खीर पिऊन टाकली. त्याला खूपच हुशारी वाटूं लागली. सुजातानें दिलेला

सोन्याचा वाडगा त्यानें नैरंजना नदींत भिरकावून दिला. 'मला बुद्धत्व प्राप्त होणार असेल तर हा वाडगा नदींत तरंगेल. नाहींतर तो तळाशीं जाईल.' तों काय चमत्कार! वाडगा कागदाच्या नावेसारखा पाण्यावर तरंगूं लागला! गौतम हा खरोखर आपण नवसलेला देवच आहे याविषयीं सुजाताला शंका उरली नाहीं.

जरा हुशारी वाटल्यावर गौतम बोधिवृक्षाजवळ आला. तेथें तो चिंतनांत मग्न झाला. आतां साक्षात्काराचा क्षण अगदीं जवळ आला होता. पण आतां त्याला मोठेंच दिव्य करायचें होतें. देवाचा शत्रु जो मार तो बुद्धाची तपश्चर्या भंग करण्यासाठीं चंग बांधून आला होता. जगांत सत्याचा जय होऊं नये, माणसांनीं शांतिप्रेमानें वागूं नये, मोहाला बळी पडावें अशी दुष्ट इच्छा धरणारीं माणसें असतात. मार म्हणजे अशा लोकांचा मोहोरक्या. त्यानें मोठें वादळच निर्माण केलें. गर गर गर ऽऽ भोंवतालचे दगड, डोंगर, झाडें सारीं आपल्या भोंवतीं फिरत आहेत असें क्षणभर गौतमाला वाटूं लागलें. असंख्य पानें भिरभिरूं




सुजाता नैवेद्य घेऊन आली. (बोरोबुदूर-जावा)

लागलीं. कानठळ्या बसतील असे आवाज होऊं लागले. बोधिवृक्ष मुळासकट उलथून पडून त्याखालीं गौतम सांपडतो कीं काय असें वाटूं लागलें. पण गौतम शांतपणें चिंतन करीत होता.

पुनः दुसरा हल्ला मारानें केला. भोंवतालचें जंगल पेट घेऊन उठलें! आगींत होरपळत जाणारीं श्वापदें कर्कश आरोळ्या मारीत गौतमाकडे येऊं लागलीं. एवढ्यानेंहि भागलें नाहीं. आपल्या तलवारी परजीत आणि डरकाळ्या फोडीत अक्राळ विक्राळ राक्षस गौतमाकडे येऊं लागले!

गौतमाची शांति अढळ राहिली.

मारानें आतां आपला पवित्रा बदलला. भीति दाखवून गौतम बधत नाहीं असें त्याला आढळून आलें. मग त्यानें मोहाचा प्रयोग सुरू केला. झनक झनक पैंजणें वाजवीत गौतमापुढें अप्सरांचा तांडा येऊन उभा राहिला. फुलासारख्या नाजुक आणि चंद्रासारख्या सुरेख अशा त्या अप्सरा होत्या. विजेसारख्या त्या लवलवत होत्या. सुस्वर कंठानें गाणें गात त्या अप्सरांनीं गौतमाभोंवतीं फेर धरला. कित्येकजण त्याच्या अगदीं जवळ जाऊन नाना तऱ्हेचे हावभाव करीत उभ्या राहिल्या.




माराच्या सैन्याचा गौतमावर हल्ला. (बोरोबुदूर-जावा)

गौतमाचें चित्त तरीहि विचलित झालें नाहीं.

माराच्या भात्यांत शेवटला बाण अजून शिल्लक होता. त्यानें यशोधरेची मूर्ति गौतमापुढें उभी केली. दीन वदनानें ती गौतमाला म्हणूं लागली, " नाथ, या दासीला आपण विसरलां का हो ? " पण याहि वेळीं गौतम मनानें स्थिर राहिला. माराच्या या साऱ्या उपद्व्यापांनीं जराहि विचलित न होतां, गौतम त्याला अधिकारवाणीनें म्हणाला, "अरे नीच मारा, तुझ्या या हल्ल्यांचा माझ्यावर कांहीं परिणाम होणार नाहीं. गर्व, वासना, कंटाळा हेंच तुझें सैन्य. श्रद्धा आणि उत्साह यांनीं माझें अंतःकरण भरलेलें आहे. तुझें सैन्य येथें साफ पराभूतच होणार. मरणाची भीति मला घालशील तर त्याचाहि कांहीं उपयोग नाहीं. " आतां मात्र मार चरकला. या धर्मात्म्यापुढें आपला कांहीं निभाव लागणार नाहीं हें त्याला कळून चुकलें आणि हळूच त्यानें काढता पाय घेतला.

सर्व प्रकारांच्या मोहांना पालाण घालून गौतम ध्यानस्थ बसला. अखेर तो दिव्य क्षण उगवला. वैशाख पूर्णिमा. आकाश स्वच्छ होतें. सुगंधित वारे वाहात होते. गौतमाला अकस्मात् धर्मतत्त्वाचा साक्षात्कार झाला. निराशेच्या अंधारानें व्यापलेल्या त्याच्या अंतःकरणांत दिव्य तेज पसरलें. एक अपूर्व आनंद त्याला मिळाला. त्या भरांत तो म्हणाला, " हें शरीररूपी घर उभें करणाऱ्या तृष्णेला शोधतां शोधतां किती जन्म घेतले. पण तिचा शोध लागला नाहीं. जन्म-मरणाच्या फेऱ्यांत सापडणें ही किती वाईट गोष्ट आहे ! पण हे तृष्णे, आतां मीं तुला पक्कें जाणलें आहे. आतां पुनः तुला हें घर उभारतां येणार नाहीं. त्याचे वासे आणि खांब मोडले आहेत. "

गौतम अशा रीतीनें ' बुद्ध ' झाला. म्हणजे त्याला पूर्ण धर्मज्ञान झालें. मोक्षसुखाचा अनुभव घेत तो बसला असतां दहा हजार देवदूत आले. त्यांनीं बुद्धाला आणि बोधिवृक्षाला गंगेच्या पाण्यानें स्नान घातलें. तपश्चर्येनें क्षीण झालेलें गौतमाचें शरीर ताजेतवानें झालें. इतक्यांत तो दुष्ट मार तेथें आला आणि




बोरोबुदूर-जावा येथील लेण्यांतील एक खोदकाम

म्हणाला, "तूं आतां बुद्ध झालास ना ! आतां आपला अवतार संपवायला तुला कांहीं हरकत नाहीं."

बुद्धदेव त्याला म्हणाला, "अरे, केवळ स्वतःचा उद्धार असें माझें आप्पलपोटें ध्येय नाहीं. मीं शोधून काढलेला आनंदाचा ठेवा मी सर्व जगाला देणार. तें केल्याशिवाय मी हें जग सोडणार नाहीं."

आणि कांहीं दिवसांनीं बोधिवृक्षाखालील आपला मुक्काम हलवून बुद्धदेव धर्मोपदेश करण्यासाठीं बाहेर पडला.



# ४. बहुजनहिताय बहुजनसुखाय

बोधिवृक्षाखालीं बुद्धदेव दोन महिने राहिला. आपणांला झालेल्या साक्षात्कारावर त्यानें चिंतन केलें. आपलीं धर्मतत्त्वें ठरविलीं. जे पांच भिक्षु त्याच्याबरोबर तपश्चर्या करीत होते ते त्याला भेटायला आले. आपल्या धर्माचा उपदेश त्यानें प्रथम या भिक्षूंना केला. बौद्ध धर्म स्वीकारणारे हेच पहिले पांच भिक्षु होत. बुद्धदेव त्यांना म्हणाला—

“कठोर व्रतें आणि विषयांचें अतिसेवन हीं दोनहि टोकें टाळलीं पाहिजेत. या दोन टोकांच्या मधोमध जो मार्ग आहे तोच निर्वाणप्राप्तीचा खरा मार्ग होय. जग हें दुःखमय आहे, वासनेमुळें दुःख निर्माण होतें. त्या दुःखाचा नाश करायचा असेल तर वासनेचा परिहार केला पाहिजे, आणि मी सांगतों त्या मार्गानेंच तो परिहार

होईल. हा मार्ग अष्टांगिक आहे, म्हणजे त्याला आठ बाजू आहेत, त्या कोणत्या ? यथार्थ ज्ञान, चांगल्या गोष्टी करण्याचा निश्चय, चरितार्थाचें योग्य साधन, उत्तम भाषा, उत्तम कृत्यें, योग्य प्रकारचे प्रयत्न व विचार, आणि मनाची शांतियुक्त स्थिति. ”

याच वेळीं दोघे वैश्य पुत्र तेथें आले. पांचशें शृंगारलेले रथ त्यांच्या ताफ्यांत होते. रथांच्या चाकांचे आणि घोड्यांच्या टापांचे आवाज गगनाला जाऊन भिडले. पण काय चमत्कार ? रथांचे घोडे पुढेंच जाईनात ! सारथ्यांनीं कडाड् कडाड् चाबूक उडविले, तरी घोडे आपले तेथेंच घोटाळताहेत ! इतक्यांत एक शहाणा मनुष्य तेथून जात होता. त्यानें त्या दोन वैश्यपुत्रांस सांगितलें, “ अरे, तो पहा, त्या वृक्षाखालीं ईश्वराचा अवतार बसला आहे. ” मग वैश्यपुत्र बुद्धदेवाजवळ आले. त्यांनीं त्याला प्रणिपात केला आणि मोठाले नजराणे त्याच्यापुढें ठेविले. त्या नजराण्यांना हातानें नुसता स्पर्श करून बुद्धदेवानें ते शिष्याकडे देऊन टाकले. आतां त्याच्या भोंवतालचा शिष्यसमुदाय हळूहळू वाढूं लागला होता.

धर्माचा साक्षात्कार झाल्यावर राजगृहाला यायचें बुद्धदेवानें राजा बिंबिसार याला वचन दिलें होतें. तें पुरें करण्यासाठीं तो आपल्या शिष्यांसह राजगृहास आला. बिंबिसार मोठ्या समारंभानें बुद्धदेवाला सामोरा गेला. त्यानें सुवर्णपात्रांतून बुद्धदेवाच्या हातावर उदक सोडलें. ज्या ठिकाणीं बुद्धदेव उतरला होता तें वेणुवन बिंबिसारानें बुद्धदेवाला अर्पण केलें. ‘ ही माझी देणगी भगवानांनीं स्वीकारावी, ’ असें बिंबिसारानें विनविलें. बुद्धदेवानें देणगीचा स्वीकार केला. या वेणुवनांत बुद्धदेव राहिला. बिंबिसार राजानें बौद्ध धर्म स्वीकारला. बुद्धदेवानें शोधून काढलेल्या धर्माला राजमान्यता मिळाली. वेणुवनांत बुद्धदेव दोन महिने होता. बिंबिसार राजा आणि आपले शिष्य यांना त्यानें धर्मोपदेश केला. नंतर मुक्काम हलवितांना तो म्हणाला, “ भिक्षूंनो, आतां तुम्हांला माझा धर्ममार्ग नीट कळला आहे. आतां आपण एकत्र राहण्याचें कारण नाहीं. माझा धर्म सर्वांना समजावून सांगा. बहुजनाच्या हितासाठीं आणि बहुजनाच्या सुखासाठीं सर्वत्र संचार करा. ”

इकडे गौतमबुद्धानें राज्यत्याग केल्यापासून कपिलवस्तु नगरीवर दुःखाची छाया पसरली होती. गौतमाच्या तपश्चर्येच्या काळांत शुद्धोदनाला त्याचा कांहींच माग लागला नाहीं. त्यानें हिमालयापर्यंत माणसें पाठविलीं. परंतु कुणालाहि गौतम सांपडला नाहीं. शुद्धोदन अत्यंत कष्टी होता. एकुलता एक मुलगा आपल्या मागून सिंहासनावर बसावयाचा तो विरक्त होऊन विजनांत निघून गेला याची म्हाताऱ्याला फार खंत वाटे. गौतमाची माता महाप्रजावती गौतमी हीदेखील चिंताक्रांत असे. बिचारी यशोधरा तर काय अश्रूंच्या पाण्याशीं तुकडा खाऊन दिवस काढीत होती. गौतम गेल्यापासून ती फक्त एकच वेळ जेवून राही. शुभ्र वस्त्रें परिधान करी. साऱ्या उंची वस्त्राभरणांना तिनें रजा दिली. तिला राहून राहून खेद वाटे तो एका गोष्टीचा. ती गोष्ट म्हणजे आपले पतिदेव आपणांस न सांगतां निघून गेले ही होय. आपल्या चिमुकल्या राहुलकडे पाहून ती दिवस कंठीत होती. तिला अंतःकरणाच्या कोपऱ्यांत एवढी मात्र आशा वाटे कीं, एक दिवस बुद्धदेव परत राजवाड्यांत येतील.



अनुराधापूर (सीलोन) येथील बुद्धमूर्ति

आणि सहा वर्षें गेल्यावर अखेर तो दिवस उगवला. बुद्धदेवाची कीर्ति पसरत चालली. तेव्हां ती कानावर आल्यावर अर्थातच शुद्धोदनाला गौतमाची भेट केव्हां होईल असें होऊन गेलें. गौतमाचा विश्वासू नोकर तो सारथी राजाचा निरोप घेऊन बुद्धदेवाकडे गेला. आतां आपल्या आप्तस्वकीयांस भेटण्यास बुद्धदेवाला कांहीं

अडचण वाटत नव्हती. त्यानें कपिलवस्तूस येण्याचें कबूल केलें. आणि तो निवडक शिष्य घेऊन आपल्या राजधानीस आला. आपला मुलगा धर्मात्मा होऊन आला याबद्दल राजास अर्थातच आनंद झाला होता. पण आपल्या कल्पनेप्रमाणें त्यानें संसाराचा मार्ग अवलंबिला नाहीं याचेंहि त्याला वाईट वाटत होतें. बुद्धदेव दृष्टीला पडतांच त्याला प्रेमाचें भरतें आलें. आपलें वडीलपण विसरून त्यानें मुलापुढें लोटांगण घातलें. मोठा दरबार भरवून त्यानें आपल्या पुत्राचा सत्कार केला.

मानी यशोधरा अंतःपुरांतून बाहेर आली नाहीं. तिचें मन हेलकावें खात होतें. तिला एक वेळ वाटे कीं, धांवत जाऊन आपल्या पतिदेवास डोळे भरून पाहावें. अनेक वर्षांच्या विरहानें तिची उत्सुकता अगदीं तापून गेली होती; पण पुनः तिला वाटे आपणांस न कळवितां जो निघून गेला त्याला आपणहून कां म्हणून भेटायला जावें ! उत्कंठा आणि अभिमान यांची झुंज तिच्या मनांत चालू होती. बुद्धदेवानें पत्नीविषयीं चौकशी केली. ती दुःखीकष्टी होऊन अंतःपुरांतच पडून राहिली आहे असें त्याला कळलें, तेव्हां बुद्ध स्वतः होऊन तिकडे गेला. पतीचें दर्शन होतांच तिचें अंतःकरण विरघळलें. ती रडत रडत पतीच्या पायांवर पडली. बुद्धानें तिचें सांत्वन केलें. यशोधरेनें नंतर आपल्या पुत्रास पतीपुढें आणलें. राहुलनें याच वेळीं प्रथम आपल्या पित्यास पाहिलें. बुद्धानें पत्नीजवळ आपल्या संघासाठीं राहुलची भिक्षा मागितली. तिचा आतां तोच एक आधार होता. संसारांत ती एकाकी होती, पण अखेर भारतीय स्त्रीचें अंतःकरण तिनें प्रगट केलें. आपल्या जीवनांतलें एकमेव सुखनिधान तिनें पतिदेवाच्या हवालीं केलें. त्यागाची हुंडी कांठोकांठ भरली. असो. पुढें यशोधरा आणि बुद्धाची सावत्र आई गौतमी ही देखील बौद्धसंघामध्यें दाखल झाली. यानंतर गौतम परत राजगृहास आला.

सावस्ती नगराजवळ बुद्धदेवास जेतवन म्हणून एक उद्यान मिळालें. बुद्धाच्या अनेक उद्यानमठांत जेतवन सर्वांत सुंदर होतें असें म्हणतां येईल. याची कथा मोठी मजेदार आहे. अनाथपिंडक म्हणून कोणी श्रीमंत व्यापारी होता. सुमारें ५००

बैलगाड्या माल भरून अनाथ पिंडक व्यापारास निघाला असतां त्याला बुद्धदेवाचें दर्शन झालें. बुद्धदेवाच्या उपदेशानें मोहित होऊन अनाथपिंडक त्याचा भक्त बनला. जेतवनासारखें भव्य व सुंदर उद्यान बुद्धदेवाला व त्याच्या संघाला अर्पण करावें असें अनाथपिंडकाला वाटलें. पण उद्यानाचा मालक भरमसाट किंमत मागूं लागला. उद्यानाची सर्व जमीन झांकून जाईल एवढीं नाणीं अनाथपिंडकानें पसरावींत तर हें उद्यान आपण त्याला देऊं असें मालकानें सांगितलें. गुरुभक्तीपुढें अनाथ-पिंडकाला पैशाचें मोल नव्हतें. त्यानें गाड्या भरून नाणीं आणलीं आणि तीं जेतवनाच्या भूमीवर पसरून मालकाची मागणी पुरी केली. नंतर मोठ्या समारंभ-पूर्वक अनाथपिंडकानें तें उद्यान बुद्धदेवाच्या हवालीं केलें.

बुद्धदेवाच्या परिवारांत मोठमोठे लायक शिष्य येऊं लागले. सारिपुत्त आणि मोग्गलान हे दोन विद्वान् ब्राह्मण होते. बुद्धदेवाच्या शिष्याची सारिपुत्ताशीं सहज गांठ पडली. तेव्हां शिष्यानें कांहीं धर्मचर्चा केली. सारिपुत्ताला त्या चर्चेंत कांहीं नवा अर्थ दिसला. तो शिष्याला आणखी कांहीं शंका विचारूं लागला. तेव्हां शिष्य म्हणाला, “ जवळच आमचे गुरु भगवान् बुद्धदेव राहात आहेत. त्यांना संपूर्ण धर्मज्ञान झालें आहे. त्यांना आपण आपल्या सर्व शंका विचाराव्या. ” तेव्हां सारिपुत्त बुद्धदेवाकडे आला. बुद्धदेवाची अपूर्व कांति पाहून आणि त्याचा उपदेश ऐकून सारिपुत्त दिपून गेला आणि त्यानें बुद्धदेवाचें शिष्यत्व पत्करलें. त्याचा मित्र मोग्गलानहि बुद्धशिष्य झाला. हे दोघे बुद्धाचे प्रमुख शिष्य म्हणून त्यांना अग्रश्रावक म्हणतात.

आनंद हा बुद्धदेवाचा पट्टशिष्य. हा शाक्यकुलांत जन्मलेला राजपुत्र असून बुद्धदेवाचा जवळचा नातेवाईक होता. बुद्धदेव कपिलवस्तु राजधानींत आला तेव्हां याच्या पित्यानें याला बुद्धदर्शनास जाण्याची बंदी केली होती. बुद्धदेवाच्या प्रभावानें आपला मुलगा संसार सोडून जाईल अशी आनंदाच्या पित्याला भीति वाटत होती. पण आनंद गुप्तपणें बुद्धदेवाच्या दर्शनाला गेला. जिवाशिवाची भेटच ती ! बुद्धदेवानें आनंदावर वरदहस्त ठेवला. आनंदानें बुद्धाची पुढें आमरण

सेवा केली. बुद्धदेवांकडे कुणी चर्चेसाठीं अथवा दर्शनासाठीं आल्यास आनंदच त्याला बुद्धदेवाकडे घेऊन जाई. चर्चेच्या वेळीं तो बुद्धदेवाजवळ असे. आपले अगदीं खोलांतले विचारदेखील बुद्धदेव आनंदाजवळ सांगत असे.

बुद्धदेवांकडे निरनिराळ्या व्यवसायांत कुशल असलेले लोक शिष्य म्हणून येऊं लागले. जीवक नांवाचा एक वैद्यविद्येंत पारंगत माणूस होता. यानें आपल्या आचार्यापाशीं समग्र वैद्यविद्या संपादन केल्यावर आचार्यांनीं त्याला सांगितलें कीं, "सोळा मैलांच्या टापूंत हिंडून औषधी नसलेली अशी एखादी वनस्पति शोधून आण." तेव्हां जीवक त्याप्रमाणें हिंडला. पण औषधी नसलेली अशी वनस्पति त्याला सांपडली नाहीं. आणि तसें त्यानें गुरूला येऊन सांगितलें. आपण दिलेलें ज्ञान यानें योग्य रीतीनें आपलेंसें केलें आहे अशी गुरूला खात्री पटली आणि त्यानें जीवकाला आशीर्वादपूर्वक निरोप दिला. पुढें बुद्धदेवाची गांठ पडून जीवक बुद्धदेवाचा शिष्य बनला. तो रुग्ण लोकांना उपचार करी. कित्येक रोगांवर जीवकाचे उपचार अगदीं रामबाण ठरत. तेव्हां कित्येक मतलबी रोगी बौद्धसंघांत भिक्षु म्हणून प्रवेश करीत. जीवकाकडून औषधोपचार करून घेत आणि रोगमुक्त होतांच संघाला रामराम ठोकीत ! तेव्हां रोगपीडितांना बौद्ध-संघांत प्रवेश मिळणार नाहीं असा कडक नियम बुद्धदेवाला करावा लागला.

लोकसंग्रहाच्या कामीं बुद्धदेवाचा हात धरणारा कुणी झालाच नाहीं असें म्हटलें तरी चालेल. पहिल्या परीक्षेंतच कच्चें मडकें कोणतें व पक्कें कोणतें याचा त्याला नेमका अंदाज येई. प्रश्न विचारण्याची त्याची पद्धति मोठी विलक्षण असे. धर्मप्रचाराकारितां शिष्याला दूर ठिकाणीं पाठवितांना बुद्धदेव त्याची मार्मिक चांचणी घेई. एकदां पूर्ण नांवाच्या आपल्या शिष्याला बुद्धदेवानें धर्मप्रचारासाठीं दुसऱ्या देशांत पाठविण्याचें ठरविलें. त्याला बुद्धदेव म्हणाला, "पूर्णा, तूं ज्या देशास जात आहेस तेथले लोक दुष्ट, कडवे, अत्याचारी आहेत. ते तुझी निंदा करूं लागले किंवा शिव्या देऊं लागले तर काय करशील ?" "मी चूप बसेन." "आणि त्यांनीं तुला धरून चोप दिला तर ?" बुद्धदेवानें विचारलें. "मी


त्यांना उलट मारणार नाहीं." पूर्णानें उत्तर दिलें, "पण समज. पूर्णा, तुला त्यांनीं ठार मारण्याचा प्रयत्न केला तर तूं काय करशील? तुझें चित्त ठिकाणावर राहील काय?" यावर पूर्ण म्हणाला, "भगवन्, त्या लोकांनीं मला या जगांतून नाहींसें करण्याचें ठरविलें तरी मी त्यांचे आभारच मानीन. कारण त्यामुळें संसारांत जे त्रिविध ताप भोगावे लागतात त्यांतून माझी सुटका होणार आहे." पूर्णाच्या या उत्तरानें बुद्धदेव फार संतुष्ट झाला. क्रोधाला शांततेनें जिंकावें, दुष्टाला साधुत्वानें जिंकावें, हिंसेला अहिंसेनें तोंड द्यावें हा आपला उपदेश पूर्णानें नीट अंगीं बाणविला आहे याविषयीं त्याची खात्री झाली आणि त्यानें पूर्णाला आनंदानें त्याच्या कामगिरीवर पाठविलें.

बुद्धदेव प्रथम स्त्रियांना संघांत घेण्यास नाखूष होता. परंतु पुढें प्रत्यक्ष मातेनेंच संघांत येण्याबद्दल आग्रह धरल्यामुळें त्याचा नाइलाज झाला. महाप्रजावती गौतमी आणि यशोधरा यांच्याप्रमाणें अनेक स्त्रिया बुद्धदेवाच्या भिक्षुणी संघांत आल्या. बिंबिसार राजाची स्वरूपसुंदर राणी खेमा ही मोठी गर्विष्ठ होती. आपल्यासारखी देखणी स्त्री त्रिभुवनांत नाहीं असा तिला गर्व झाला होता. आढ्यतेमुळें ती कित्येक दिवस बुद्धदेव वेणुवनांत असतांना त्याच्या दर्शनास गेलीच नाहीं. बिंबिसार तिला बुद्धदेवाच्या दर्शनास जाण्याचा सतत आग्रह करीत असे. अखेर एकदां मोठ्या कष्टानें ती तयार झाली. खेमा बुद्धाच्या जवळ पोहोंचली तेव्हां तिच्याहून एक लावण्यवती स्त्री बुद्धाला वारा घालीत होती. तिला पाहून खेमाचा आपल्या सौंदर्याविषयींचा गर्व थोडासा खालीं आला. खेमा त्या लावण्यमयी स्त्रीकडे थोड्या मत्सरानें निरखून पाहूं लागली. तों ती स्त्री बदलत गेली. तिची कांति आणि सौष्ठव नष्ट होत गेलें. तिच्या गालांना सुरकुत्या पडल्या. आणि तिच्या जागीं क्षणार्धांतच एक वृद्ध, खप्पड रुग्ण स्त्री उभी आहे असा खेमाला भास झाला. खेमाच्या डोळ्यांत अंजन पडलें. तारुण्य आणि सौंदर्य हीं अशाश्वत आहेत हें तिला कळून चुकलें. आणि ती बुद्धाची निष्ठावंत भक्त बनली. याचप्रमाणें अनेक स्त्रियांनीं बौद्धसंघाची दीक्षा घेतली.

भारतांत ज्या वेळीं जुन्या वैदिक धर्माचा विशेष प्रभाव होता त्या वेळीं बुद्धदेवानें आपला साधा, सुबोध आणि बुद्धीला पटणारा धर्म प्रसृत करण्यास सुरुवात केली. वेद हे फक्त तीन वर्णांकरितां आहेत. अमुक वर्ण उच्च, अमुक नीच, अशा भेदांनीं जुना धर्म ग्रासलेला होता. यज्ञांत खूप संपत्ति खर्च होई आणि प्राणी बळी दिले जात. शिवाय या यज्ञयागाचें फळ फक्त उच्च वर्णीयांनाच मिळणार असा समज होता. धर्मांतील ही विषमता आणि हें कर्मकांड बुद्धानें नाहींसें केलें. हीच त्यानें केलेली मुख्य क्रांति होय. त्याच्या शिष्यगणांमध्यें सारिपुत्त, मोग्गलान यांसारखे ब्राह्मण पंडित होते. आनंद, आनिरुद्ध यांसारखे क्षत्रिय होते. यश, अनाथपिंडक यांसारखे धनाढ्य वैश्यहि होते. पण बुद्धदेवाचा परिवार याहीपलीकडे पसरलेला दिसतो. अंगुलिमाल हा रामोशाचा धंदा करणारा भुरटा पश्चात्ताप पावून आला तेव्हां बुद्धानें त्याला प्रेमानें आपल्या संघांत घेतलें. बुद्धशिष्य स्वाति हा कोळी, तर उपाली हा न्हावी होता. आपल्या शिष्यिणींताहि बुद्धदेवानें सामाजिक दर्जाचा किंवा वर्णाचा भेदभाव न दाखवितां सर्वांना जागा दिली. त्यांत आम्रपालीसारखी वेश्या होती, त्याप्रमाणें चंपेसारखी पारध्याची मुलगी होती. अशा रीतीनें आपल्या धर्माचीं व संघाचीं क्षितिजें बुद्धदेवानें खूप व्यापक केलीं. आणि भारतांतील बहुजनसमाजाला नवी श्रद्धा व नवी आशा मिळवून दिली.

रूढ अशा धर्मापेक्षां खऱ्या धर्माची व नीतीची प्रतिष्ठा बुद्धदेवानें वाढविली. त्याचें बोलणें बिनतोड असे. त्याचा सारा भर तर्कावर होता. एकदां भारद्वाज या नांवाच्या ब्राह्मणाकडे मोठा उत्सव सुरू असतां बुद्धदेव तेथें भिक्षा मागावयाला गेला. भारद्वाज मोठा कर्मठ ब्राह्मण होता. तो स्वतः जमीनदार असून यमनियम पाळण्यांत दक्ष असे. आपल्या घरीं मंगल उत्सव चालू असतां एका मुंडन केलेल्या संन्याशानें दाराशीं भिक्षा मागायला यावें याची भारद्वाजाला चीड आली. बुद्धदेवाच्या अंगावर खेंकसून तो म्हणाला, ‘अरे गोसावड्या, चालता हो. आम्हीं निढळाच्या घामानें शेतांत राबावें आणि तूं आयतें खायला मागावेंस हें तुला शोभत नाहीं.’ बुद्धदेव शांतपणें म्हणाला, ‘महाराज, मीहि एक शेतकरी

आहे.' ब्राह्मणानें विचारलें, 'कुठें आहेत तुझे बैल आणि शेत ?' तेव्हां बुद्धानें उत्तर दिलें, 'भ्रांत झालेल्या माणसांचीं अंतःकरणें हें माझें शेत. प्रज्ञा हा माझा नांगर, वीर्य हा माझा बैल, धर्म हा दंड आणि श्रद्धा हें बीज आहे. मी चोहींकडे प्रज्ञेचा नांगर फिरवून अज्ञानाचे कांटे काढून टाकतों आणि श्रद्धेची पेरणी करतों. या शेतकामाला जें पीक येतें त्याला निर्वाण असें नांव आहे.' या उत्तरानें भारद्वाज संतुष्ट झाला. आणि बुद्धाची योग्यता जाणून त्याला शरण गेला. अशा रीतीनें अगणित शिष्य जमवून सुमारें पंचेचाळीस वर्षें बुद्धदेवानें भारतांत आपल्या धर्माचा चोहींकडे प्रसार केला. आणि पुढें तर हिमालय आणि समुद्र ओलांडून त्रिखंडांत त्याच्या धर्माची प्रभा पसरली.



संग्रहालय,
अनुक्रम
विभाग
क्रमांक
नों. दि.
वाचनालय

# ५. दिनचर्या आणि उपदेश

भगवान् बुद्ध अत्यंत कांतिमान् होता. त्याचें शरीर प्रमाणबद्ध व अवयव रेखीव होते. त्याच्या चेहऱ्यावर असाधारण शांतता दिसत असे. एखादें भव्य व स्वच्छ सरोवर असावें आणि त्यावर निर्मळ आकाशाचें प्रतिबिंब ठसावें तसें त्याचें मुखमंडल दिसे. बुद्धदेव गयेहून वाराणसीला जातांना वाटेंत भेटलेल्या उपक नांवाच्या संन्याशानें त्याच्या प्रसन्नतेचें व कांतीचें रहस्य विचारलें होतें. तेव्हां आपण सर्व पापकारक वृत्तींना जिंकलें आहे म्हणून असें दिसतों असें बुद्धदेवानें उत्तर दिलें. आहाराविहारांत त्याचा नियमितपणा व साधेपणा वाखाणण्यासारखा असे.

माणसानें आपला जीवनक्रम कसा ठेवावा याविषयीं बुद्धानें सोमाला केलेला उपदेश फार उत्कृष्ट आहे. या सोमानें नाना तऱ्हेचे उपासतापास, व्रत-वैकल्यें करून धर्मसाधना केली. पण त्याला कांहींच फायदा झाला नाहीं. तेव्हां

अगदीं दुसऱ्या टोंकाला जाऊन चैनींत व ऐषारामांत काळ घालविण्याचें त्यानें ठरविलें. पण याच सुमारास त्याची आणि बुद्धदेवाची गांठ पडली. बुद्धदेवानें सोमाला विचारलें, " आपणांला सतार, वीणा असें एखादें वाद्य वाजवितां येतें का ? "

" येतें, महाराज. "

" मग असें पहा. " तारा अतिशय ताणल्यानें त्यांतून चांगला सूर निघतो काय ? "

" नाहीं, महाराज. "

" तारा फार ढिल्या सोडल्यानेंहि सुस्वर निघत नाहींत. हो कीं नाहीं ? "

" हो. "

" तारा फार ताणल्या नाहींत आणि ढिल्याहि सोडल्या नाहींत तर मधुर झंकार निघतात ना ? "

" होय महाराज. निघतात. "

" सोमा, माणसाच्या अंगच्या शक्तीचेंहि तसेंच आहे. ती फार ताणून उपयोग नाहीं. ती नुसती ढिली सोडली तर माणूस बेसावध, आळशी, हलगर्जी बनेल. म्हणून प्रत्येक माणसानें आपल्या शारीरिक व मानसिक शक्तीचा मध्यबिंदु शोधून काढावा आणि त्या मध्यम मार्गानें जावें. "

आपल्या जीवनांत बुद्धदेवानें हाच मध्यम मार्ग यशस्वी रीतीनें आचरून जगाला कायमचा धडा घालून दिला.

बुद्धदेव जनवस्तींत सहसा रहात नसे. गांवाला लागून असलेल्या एखाद्या देवळांत, धर्मशाळेंत किंवा उद्यानांत तो मुकाम करी. तो भल्या पहाटे उठत असे. उठल्यानंतर ध्यान करी किंवा आपल्या निवासाच्या समोर शतपावली ( चंक्रमण ) करी. सकाळच्या प्रहरीं तो गांवांत भिक्षाटनासाठीं जाई. बुद्धदेवाच्या पात्रांत सर्व जातींच्या लोकांनीं शिजविलेल्या अन्नाची भिक्षा असे. पुरेशी भिक्षा मिळाल्यावर गांवाबाहेर येऊन तो भोजन करी आणि थोड्या विश्रांतीनंतर ध्यानस्थ बसे.

सायंकाळीं व पहिल्या रात्रीं धर्मचर्चा, जिज्ञासूंचें शंकासमाधान, उपदेश चाले. एक प्रहर रात्र झाली कीं, आपल्या अंथरीवर उशाला हात घेऊन बुद्धदेव उजव्या कुशीवर झोंपीं जाई. या शय्येला 'सिंहशय्या' असें नांव आहे. बुद्धदेवाला नेहमीं सुखाची झोंप लागे. याचें कारण तो म्हणे, "पेटीसारखें घर आहे, पलंग आहे, पराची गादी आहे. पण शरीराला किंवा मनाला कांहीं व्याधि असेल तर झोंप येणार नाहीं. निद्रेचा भंग करणारे जे कामक्रोधादि विकार ते मीं काढून टाकले आहेत. मग मला कुठेंहि सुखाची झोंप आली यांत काय आश्चर्य?' स्वतः भिक्षाटनास जाण्यांत बुद्धदेवाचा मुख्य उद्देश लोकांचा सहवास लाभावा आणि त्यांना धर्मोपदेश करतां यावा हा असे. भिक्षाटनाच्या वेळीं त्याचा उपदेश सुरूच असे. कोणी प्रश्न विचारीत त्यांना त्याच ठिकाणीं बुद्धदेव उत्तरें देई. त्या वेळीं चर्चा अपुरी राहिल्यास माणसें सायंकाळीं विहारांत येत. विहाराची शिस्त फार वाखाणण्यासारखी असे.



बुद्धमूर्ति (गांधार)

बुद्धदेवाचा अवतार होण्यापूर्वीं संन्याशांचे समुदाय होतेच. परंतु त्यांत एका ठराविक वर्णाचा भरणा असे. स्वतः अध्ययन व तपश्चर्या करायची ही त्यांची वृत्ति होती. बुद्धदेवाचे शिष्यसंघ बहुजनसमाजापासून अलिप्त रहात नसत. ते देशभर संचार करीत असतां सर्वांशीं मिसळून धर्मोपदेश करीत. फक्त पावसाळ्यांतच ते एके ठिकाणीं रहात. बाकीच्या ऋतूंत त्यांची भ्रमंती चालू असे. दिव्यानें दिवा लागावा त्याप्रमाणें शिष्यांच्या सतत संचारामुळें सर्वत्र धर्मज्योत पेटविली जाई.

गडबड, गोंधळ, शुष्क वादविवाद यांची बुद्धदेवाला फार चीड होती. सकाळीं भिक्षाटनाला गेला असतां तो कित्येकदां संन्याशांच्या मठांना भेटी देई.



● ● भिक्षेस निघालेला बुद्धदेव ● ●

त्याला लांबून येतांना पाहिलें कीं, सर्वजण एकमेकांस म्हणत. " गडबड बंद करा. भगवान् बुद्धदेव येत आहे. त्याला बेशिस्त वागणूक व गोंगाट आवडत नाहीं. " एकदां बुद्धदेवाचे प्रसिद्ध शिष्य सारिपुत्त व मोग्गलान पांचशें शिष्यांना घेऊन आले होते. कसल्या तरी मुद्द्यावर त्यांच्यांत कडाक्याचा वाद चालला होता. कुणी कुणाचा शब्द ऐकून घेत नव्हता. इतक्यांत बुद्धदेव तेथें आला आणि म्हणाला, " ही काय धर्मचर्चा आहे ! कोळी मासे पकडतांना जशी आरडाओरड चालते तशी या ठिकाणीं कां चालली आहे ? " त्या सर्व लोकांना त्यानें तेथून निघून जाण्यास फर्मावलें ! अंतःकरणांत जसा वासनांचा गोंधळ असतां कामा नये तसा वागण्याबोलण्यांतहि असतां कामा नये असें त्याचें सक्त पाहणें असे.

एकदां राजा अजात शत्रु कार्तिक पौर्णिमेच्या रात्रीं आपल्या दरबारी लोकांसह शहराबाहेरील एका उद्यानांत बसला होता. चांदणें अगदीं स्वच्छ पडलें होतें. अशा वेळीं अजातशत्रूच्या मनांत धर्मभावना जागृत झाली आणि तो आपल्याजवळच्या लोकांना म्हणाला, " या वेळीं एखादा साधु भेटला आणि त्याचा मंगल उपदेश ऐकायला मिळाला तर काय छान होईल ! " कुणी सांगितलें कीं शेजारीं आम्रवनांत बुद्धदेव आपल्या शिष्यपरिवारासह उतरला आहे तेथें गेल्यास राजाचा मनोरथ पूर्ण होईल. तेव्हां राजा अजातशत्रु निवडक लोकांसह तेथें गेला. मंडलमालांत ( तंबूच्या आकाराचा मंडप ) मंद दिवे जळत होते. एक शब्दहि ऐकूं येत नव्हता. या ठिकाणीं माणूसवस्ती आहे कीं नाहीं याचा संशय अजातशत्रूला येऊं लागला. तेव्हां जाणकार माणसांनीं सांगितलें बुद्धदेवाच्या निवासांत अशीच शांतता असते. ही शांतता म्हणजे अंतःकरणांतील शांतीचें बाहेर पडलेलें प्रतिबिंबच होय. पुढें अजातशत्रु बुद्धदेवाजवळ गेला आणि बुद्धदेवानें त्याला त्याच्या इच्छेप्रमाणें धर्मोपदेश केला.

त्या काळीं सर्व धर्मज्ञान संस्कृत भाषेंत होतें. या भाषेचे ज्ञाते ब्राह्मण असत. म्हणजे साऱ्या धर्मभांडाराच्या किल्ल्या ब्राह्मणवर्गाच्या ताब्यांत असत. क्षत्रिय व वैश्य वर्गाखेरीज इतरांना संस्कृत भाषा ऐकण्याचीहि बंदी होती. मग

तींत प्रावीण्य मिळवून धर्मज्ञान मिळविण्याचें लांबच राहिलें ! उपाध्याय वर्ग जे चार उपदेशाचे शिळेपाके तुकडे अंगावर टाकील त्यांवरच सामान्य जनतेला संतुष्ट राहावें लागे. अशा स्थितींत बुद्धदेवानें आपलीं उपदेशसूत्रें पाली या लोक-भाषेंत सांगण्यास सुरुवात केली. ही क्रांति अपूर्व होती. धर्म ही कांहीं ठरीव वर्गाची मिरासदारी नाहीं, याचा प्रत्यय येऊन बहुजनसमाजाला नवें सामर्थ्य आलें.

विषय समजावून देण्याची बुद्धदेवाची हातोटी विलक्षण होती. कधीं प्रत्यक्ष व्यवहाराचा दाखला घेऊन, कधीं रूपकें वापरून, तर कधीं समर्पक उदाहरणें देऊन तो आपला विषय जिज्ञासूंच्या अंतःकरणावर बरोबर ठसवीत असे. कित्येक शिष्य त्याला विचारीत कीं, हें जग कुणीं उत्पन्न केलें? परमेश्वर आहे कीं नाहीं ? तो म्हणे, " तुमच्या पायांत एखादा विषारी तीर येऊन शिरला तर तुमचें पहिलें कर्तव्य कोणतें ? " " तो तीर पायांतून काढणें. " " बरोबर आहे. तो तीर क्षात्रियानें मारला कीं पारध्यानें मारला याचा तुम्ही विचार करीत बसाल का ? खास नाहीं. तसेंच जीवनांतलें दुःख नाहींसें करणें याकडे लक्ष द्या. तें कुणी उत्पन्न केलें असेल यावर तर्कवितर्क करीत बसूं नका. "

किसा गौतमी नांवाची एक स्त्री बुद्धदेवाकडे आली. ही उच्च कुळांतली होती. मनासारखा पति मिळाला, सोन्यासारखा पुत्रहि झाला, पण त्या मुलाला एकाएकीं काळानें किसा गौतमीच्या मांडीवरून ओढून नेलें ! विचारी किसा गौतमी शोकानें वेडी बनली ! आपल्या शोकाचा परिहार व्हावा म्हणून इकडे तिकडे वणवण हिंडूं लागली. कुणीं तिला सांगितलें कीं, " बुद्धदेवाकडे जा. तो तुझा मुलगा परत मिळवून देईल. "

किसा गौतमी त्याप्रमाणें बुद्धदेवाकडे आली. बुद्धदेवानें तिची कहाणी सहानुभूतीनें ऐकून घेतली आणि तिला म्हटलें, " बाई, मी तुझा मुलगा परत मिळवून देईन. पण असें कर मला मूठभर मोहऱ्या आणून दे. मात्र ज्या घरांत पूर्वीं एकहि माणूस मेलें नसेल अशाच घरांतल्या त्या मोहऱ्या पाहिजेत. "

बिचारी किसा गौतमी दारोदार हिंडूं लागली. प्रत्येक घरीं ती जाई आणि त्या घरांत कुणी पूर्वी मेलें नसल्यास मूठभर मोहऱ्या द्या अशी मागणी करी. पण ज्यांत पूर्वी कधीं मृत्यु झाला नाहीं असें एकहि घर तिला मिळालें नाहीं. ती हात हलवीत बुद्धदेवाकडे परत आली. मग जीवन हें कसें नश्वर आहे आणि म्हणून मरणाचा शोक प्राण्यानें करूं नये असा उपदेश बुद्धदेवानें तिला केला. किसा गौतमीच्या मनाला शांति मिळाली.

बुद्धदेवानें जीवन हें दुःखमय आहे असें सतत सांगितलें, पण निराशावाद मात्र प्रतिपादन केला नाहीं. या दुःखावर माणसाला आपल्या सामर्थ्यानें मात करतां येते असा लढाऊ संदेश त्यानें दिला.

" तूं आपला आपणच प्रयत्नास लाग. स्वतःच आपलें परीक्षण कर. स्वतः संरक्षित आणि दक्ष असलास म्हणजे तूं आनंदानें काळ घालविशील. कारण माणूस स्वतःचा मालक आहे. ज्याप्रमाणें व्यापारी चांगला घोडा ताब्यांत ठेवतो, त्याप्रमाणें तूं आपल्या मनास ताब्यांत ठेव. " आत्मजयाचें हें तत्त्वज्ञान झुंजार नाहीं असें कोण म्हणेल ? बुद्धदेवाच्या उपदेशाचा प्रवाह सतत चालू असे. या प्रवाहांत अगणित सुंदर सुंदर तत्त्वें कमलांप्रमाणें वाहात आलेलीं दिसतात.


" रात्रीं जागणाराला रात्र मोठी वाटते. थकलेल्याला एक योजन वाट-सुद्धां लांब भासते. त्याप्रमाणें खरा धर्म न जाणणारांना हें जीवन कंटाळवाणें वाटतें. "

" आरोग्य हा सर्वांत मोठा लाभ; संतोष हें सर्वांत श्रेष्ठ धन; आत्म-विश्वास हा सर्वांत उत्तम मित्र, आणि निर्वाण हा सर्वांत मोठा आनंद होय. "

"ध्यानाचा मळ अनभ्यास; घराचा मळ नादुरुस्ती; शरीराचा मळ आळस; आणि पहारेकऱ्याचा मळ गैरसावधपणा होय. "

अशीं किती वचनें द्यावीं ! त्यांचें सौंदर्य अविनाशी आहे. जगाला लाभ-लेला हा बहुमोल ठेवा कधींहि न संपणारा आहे.

☆ ☆ ☆



# ६. वैशिष्टयें आणि विरोध

बुद्धदेवाच्या उपदेशांत तर्काला मुख्य प्राधान्य असे. तसेंच स्वावलंबनावर त्याचा भर असे. बौद्ध धर्म म्हणजे केवळ संन्याशांचा (श्रमणांचा) धर्म ही कल्पना चुकीची आहे. कारण बुद्धदेवानें श्रमण आणि संसारी या दोन प्रकारच्या लोकांकरितां वेगळे नियम करून दिले होते. श्रमणांचे नियम अर्थात् कडक असत. त्यांना देह सजविणें, विषय-सेवन करणें, रात्रीं जेवणें या गोष्टी वर्ज्य असत. संसारी माणसाला इतके कडक नियम नसत. पण नीतिधर्म दोघांना सारखाच असे. श्रमण किंवा भिक्षु यांना लोकसेवेचें काम मुख्यतः लावून दिलें होतें. जो समाज भिक्षूंची उपजीविका चालवी त्याची सेवा करणें व त्याला धर्मज्ञान देणें हें भिक्षूचें कर्तव्य होतें. 'बुद्धं शरणं गच्छामि, संघं शरणं गच्छामि, धर्मं




मथुरा येथील
बुद्ध मूर्ति

शरणं गच्छामि ' हा मंत्र उच्चारून भिक्षू संघांत दाखल होई. या भिक्षूंना व भिक्षुणींना उपदेश सांगतां सांगतांच बुद्धदेवाचीं धर्मसूत्रें तयार झालीं. ' त्रिपिटक ' ( तीन पेट्या ) नांवाच्या प्रचंड ग्रंथांत हीं सर्व सूत्रें एकत्रित केलीं आहेत. बुद्धदेवानंतर सुमारें दीडदोनशें वर्षांनीं सम्राट् अशोक होऊन गेला. त्यानें मोठाले शिलालेख तयार करून त्यांवर भगवान् बुद्धाचे उपदेश कोरून ठेविले. मोठाले स्तूप बांधले आणि सिलोन, ब्रह्मदेश इ. ठिकाणीं बौद्ध मुनि पाठवून बौद्ध धर्माचा प्रसार केला. इकडे चीन, जपान, सुमात्रा आणि इकडे स्पेन, अमेरिका येथपर्यंत बौद्ध धर्म व त्याचीं धर्मतत्त्वें प्रसारित झालीं. भारतांत जरी पुढें या धर्माला पडता काळ आला तरी त्यांतलीं तत्त्वें भारतानें अंगीं मुरविलींच. आज पुनः बुद्धदेवाचें ' धर्मचक्र ' फिरूं लागलें आहे. सम्राट् अशोकाच्या सिंहस्तंभाला राजमान्यता लाभली आहे.

बुद्धदेवाला धर्मसाक्षात्कार झाला तेव्हां त्याचें वय ३५ वर्षांचें होतें. यानंतर पंचेचाळीस वर्षें तो आपल्या धर्माचा प्रसार करीत हिंडला. एवढ्या अवधींत त्याला चोहींकडे कोपरानें खणण्यासारखी भूमि लागली असें मुळींच नाहीं. अनेक ठिकाणीं त्याला कडक विरोध सोसावा लागला. रूढ वैदिक धर्माशीं त्यानें सामना दिला होता. यज्ञ, त्यांत होणारी हिंसा, जातिभेद यांवर त्यानें हल्ला केला होता. अर्थात् या सर्वांचे पक्षपाती ब्राह्मण व क्षत्रिय बुद्धदेवावर तुटून पडत. पण तो डगमगला नाहीं. त्याचें धैर्य अलौकिक होतें. स्वतःच्या धर्मतत्त्वावर त्याची असामान्य निष्ठा होती आणि वतनदार ब्राह्मण–क्षत्रियांना जरी आपला साधा अहिंसावादी धर्म पटला नाहीं तरी सामान्य भाविक माणसांना तो पटण्यास वेळ लागणार नाहीं याविषयीं तो निःशंक होता. आणि अखेर त्याला यश मिळालें.

आपल्या धर्मतत्त्वाविषयीं गाढ श्रद्धा असल्यानें बुद्धदेव कुणाशीं तोंड देण्यास कचरत नसे. जेतवनांतून बाहेर पडून संचार करीत असतां एकदां अटवी नगरीनजीक तो आला. या नगरीवर दुःख व भीति यांची खिन्न छाया पसरलेली त्याला दिसली. शोध करतां असें कळलें कीं येथील राजा मोठ्या फिकिरींत

आहे. एका नरभक्षक वेताळाकडे राजाला दररोज एक माणूस पाठवावा लागे! तो न पाठविल्यास राजाला त्याच्या कुटुंबासह गट्ट करून टाकीन असा धाक वेताळानें घातला होता. राजानें प्रथम कैदखान्यांतले कैदी एका-मागून एक धाडून दिले. नंतर राज्यांतलीं म्हातारीं माणसें धाडलीं. आतां तरुण व तान्हीं मुलें यांच्यावर पाळी आली होती. हीं सर्व माणसें गेलीं तर उद्यां राज्याला स्मशानाचें रूप येईल म्हणून राजा त्रस्त झाला होता. बुद्धदेवाला सर्व हकीकत कळली तेव्हां तो राजाला म्हणाला, 'मी वेताळाकडे जातों तूं स्वस्थ रहा."



थायलँडमधील बुद्धमूर्ति

बुद्धदेव त्या दिवशीं वेताळाकडे गेला. लांबून त्याला येतांना पाहून वेताळ त्याला गट्ट करण्यास धांवला. पण त्याला कळून चुकलें कीं ही कांहीं सामान्य आसामी नाहीं. या माणसाच्या ठिकाणीं अलौकिक तेज आहे. तेव्हां वेताळ मध्येंच थबकला आणि बुद्धदेवास म्हणाला, "मी तुला कांहीं प्रश्न विचारतों. या प्रश्नांचीं उत्तरें तूं देशील तर तुला मी मोकळा सोडीन आणि राजालाहि मग माझ्याकडे माणसें पाठवावीं लागणार नाहींत." आणि वेताळानें पुढें विचारलें, "माणसें आपल्या वासनांतून कशीं मुक्त होतील? त्यांच्या वासनांवर त्यांना कायमचा विजय कसा मिळवितां येईल? इतर शत्रूंपासून त्यांना आपलें संरक्षण करतां येईल? जन्मरमणाच्या फेऱ्यांतून मुक्त होणें कोणत्या उपायानें शक्य आहे?"

बुद्धदेवानें उत्तर दिलें, " जो चार आर्यसत्यें जाणतो आणि निरलसपणें अष्टांगिक मार्गाची उपासना करतो तो आपल्या वासना खास मारूं शकेल. आणि त्यायोगें निर्वाण पदाला जाईल. निर्वाण म्हणजेच जन्ममरणांतून मुक्तता." वेताळानें बुद्धदेवापुढें गुढगे टेकले आणि तो त्याचा शिष्य बनला. अटवी नगरी वेताळाच्या त्रासांतून मुक्त झाली म्हणून मोठा आनंदोत्सव झाला.

बुद्धदेवाच्या शीलावर शिंतोडे उडवण्याचे प्रयत्नहि कमी झाले नाहींत. चंचा या नांवाची एक हीन स्त्री होती. भगवानाच्या हितशत्रूंनीं तिला बुद्धदेवाकडे पाठविली. बुद्धदेवावर तिनें भयंकर आरोप केले. पण हें शत्रूंचें कपट लवकरच उघडकीस आलें. आणि चंचा ही पश्चात्ताप पावून बुद्धदेवाची शिष्या बनली. आम्रपाली म्हणून एक अतिशय देखणी नर्तिकी होती. मोठमोठी श्रीमंत व सत्ताधारी मंडळी हिरेमोत्यांचीं ताटें घेऊन तिची मर्जी संपादन करण्यासाठीं झटत. ती मोठी भाविक होती. तिनें बुद्धदेवाला गुरु मानिलें. एकदां मोठ्या लव्याजम्यानिशीं आपल्या गुरूला भोजनाचें निमंत्रण देण्यासाठीं आम्रपाली निघाली. त्याच वेळीं गांवांतला एक मोठा सरदार शिपाई प्यादे घेऊन त्याच कामासाठीं बुद्धदेवाकडे निघाला होता. वाटेंत तो सरदार आणि आम्रपाली यांची शाब्दिक झटापट झाली. आपल्यासारखा तोलदार सरदार बुद्धदेवाकडे निमंत्रण द्यायला चालला असतां एका नर्तकीचें आमंत्रण बुद्धदेव स्वीकारील हें शक्यच नाहीं असें सरदाराला वाटलें. पण आपल्या भक्तीस भगवान् वश होणार ही आम्रपालीला खात्री होती. आणि तसेंच घडलें. आम्रपालीनें आपलें एक उद्यान बुद्धदेवास अर्पण केलें.

बुद्धदेवाच्या अलौकिक व्यक्तित्वानें आणि अमृतमय उपदेशानें अनेक लोक भारावून जात. हें अनेकांना पाहावत नसे. त्याच्या वाढत्या शिष्यसमुदायांत फूट पाडण्याचेंहि प्रयत्न करण्यांत आले. बुद्धाचा चुलत भाऊ देवदत्त हा बुद्धाच्या विरोधकांचा अग्रणी होता म्हटलें तरी चालेल. लहानपणीं हंसाच्या प्रकरणीं बुद्धदेवाचा विजय झाला तेव्हांपासूनच बुद्धदेवाविरुद्ध त्यानें डूक धरली

होती. तो मानभावीपणानें बौद्धसंघांत दाखल झाला खरा, पण बुद्धदेवाचा पाडाव करण्याचीं त्याचीं कारस्थानें चालूच होतीं. आपणास बुद्धानें पट्टशिष्य करावें असा त्याचा आग्रह होता. पण आनंदासारखा विश्वासू व निष्ठावंत भक्त त्या जागेवरून काढून देवदत्तासारख्या विश्वासघातकी माणसाला बुद्धदेव ती जागा कशी देणार! देवदत्तानें यामुळें चिडून जाऊन संघ सोडला आणि आपला एक नवा पंथ स्थापन केला, पण मुळांतच त्या पंथाची वाताहत झाली.




ध्यानी बुद्ध (जपान)

कारण दोनचार असंतुष्ट जीवांखेरीज तिकडे कोणी फिरकलें नाहीं. नंतर त्यानें राजा अजातशत्रु याला हाताशीं धरून बुद्धाचा छळ करण्याची शिकस्त चालविली. अजातशत्रु हा बिंबिसाराचा मुलगा. देवदत्ताच्या शिकवणीनें पेटून अजातशत्रूनें बापास ठार केलें व गादी बळकाविली. या पितृद्रोही राजाकडून देवदत्तानें बुद्धाला मारेकरी घातले. पण हे मारेकरी बुद्धाजवळ आले तेव्हां त्याची कांति पाहून दिपून गेले आणि हातांतलीं हत्यारें टाकून त्यांनीं बुद्धाच्या पायांवर डोकें ठेविलें. एकदां देवदत्तानें दगडफेक केली. तेव्हां बुद्धाच्या पायाला दगड बसला. त्याच्या पायांतून रक्त वाहूं लागलें. बुद्धदेव क्रुद्ध न होतां शांतपणें म्हणाला, ‘ या माझ्या चार थेंब रक्ताचे डाग देवदत्ताला दहा जन्म घेऊनहि धुतां येणार नाहींत.’ बुद्धदेवाची शिष्यमंडळी असल्या प्रकारानें घाबरून जात. अहोरात्र बुद्धांभोंवतीं ते पहारा करूं लागत तेव्हां बुद्ध त्यांना परावृत्त करी. अखेर एका प्रसंगानें देवदत्ताला कळून चुकलें कीं बुद्धदेवावर आपली कांहीं मात्रा चालणार नाहीं. तो प्रसंग असा : बुद्धदेव नगरांत नित्याप्रमाणें भिक्षा मागत हिंडत होता. तें पाहून देवदत्तानें एक माजलेला हत्ती त्याच्या रोखानें सोडला. वाटेंत येईल त्या वस्तूला आणि प्राण्याला चिरडून टाकीत तो अजस्र प्राणी बुद्धाकडे येऊं लागला. शहरांत हाहाःकार उडाला. आरोळ्या, आक्रोश सुरू झाले. बुद्ध बाजूला सरला नाहीं किंवा आडोशाला पळाला नाहीं. तो मदांध हत्ती बुद्धदेवापाशीं येतांच त्याचा सारा माज कमी झाला. त्यानें पुढले पाय खालीं टेकले आणि आपली सोंड वंदनपूर्वक बुद्धापुढें केली. बुद्धदेवावरील प्राणसंकट टळल्याबद्दल सर्वांनाच आनंद झाला. देवदत्तानें यापुढें मात्र असलें कांहीं कारस्थान करावयाचें धाडस केलें नाहीं.

सकाळीं सूर्योदय होतांच धुकें हळूहळू विरून पांगून जावें त्याप्रमाणें बुद्धदेवाच्या मार्गावरील विरोध मावळत गेला. आणि सर्व भारतवर्षांत एवढा ज्ञानी तेजस्वी धर्मावतार कोणी नाहीं अशी सर्वांना खात्री पटली.

☆ ☆ ☆



# ७. बुध्ददेवाचे पूर्व जन्म

बुद्धदेव जेतवनांत असतांना ग्रामीण मंडळी मोठ्या भक्तिभावानें त्याच्याकडे येत. साध्या सुबोध गोष्टी सांगून त्यांना धर्मोपदेश करण्यांत बुद्धदेवाचा हातखंडा असे. सारें उद्यान चांदण्यानें न्हाऊन निघालें आहे, दिव्याच्या ज्योती मंद झाल्या आहेत, काजवे चमचम करीत आहेत. अशा वेळीं बुद्धदेव आपल्या मागील जन्मांच्या कथा सांगे. याच प्रख्यात 'जातककथा' होत. यांत बोध आणि आशावाद दोन्ही आहेत. एकेक सद्‌गुण शिकण्यास आपणांस एकेक जन्म घालवावा लागला हें बुद्धदेव पटवून देई. मोक्ष-मार्गावर जे नुकतेच प्रवासाला निघाले आहेत त्यांना या कथा वाचून साहजिकच आशा वाटण्यास हरकत नाहीं. ससा, हरिण, माकडें, हत्ती असलेहि जन्म बुद्धदेवानें घेतले होते. मनुष्येतर

प्राण्याच्या या जन्मांतसुद्धां बुद्धदेव कांहीं ना कांहीं शिकला. यावरून मनुष्यानें आपली सहानुभूति कशी व किती विशाल करायला हवी हें दिसून येतें. जीव तेथून नुसता सारखाच नव्हे, तर क्षुद्र वाटणारा जीवसुद्धां आदर्श असूं शकतो हें बुद्धदेवानें दाखवून दिलें आहे.

एका जन्मांत बुद्धदेव काळवीट झाला होता. एका सुंदर दरींत तो हरणांच्या कळपांसह राही. त्या हरिणांचा तो राजाच होता म्हणा ना! एकदां कांहीं शिकारी लोकांनीं हे कळप पाहिले आणि राजाला वर्दी दिली कीं, त्या दरींत उत्तम शिकार आहे. राजा शिकारीचा फार नादी होता. आपला शिकारीचा संच घेऊन तो तेथें आला. हरणें घाबरून पळूं लागलीं. हरणांचा मोहोरक्या काळवीट म्हणजे बुद्ध त्यांना मार्गदर्शन करीत होता. इतक्यांत एक जलप्रवाह आडवा आला आणि बिचारीं हरणें तेथेंच थबकलीं. राजा व शिकारी पाठीवर येऊन ठेपले होते. तेव्हां काळविटानें पाण्यांत उडी घेतली. पाणी त्याच्या पाठीपर्यंतच होतें. आपल्या हरणांना त्यानें सांगितलें, 'माझ्या पाठीवरून जलप्रवाह ओलांडा.' हरणें त्याप्रमाणें काळविटाच्या पाठीवरून जलप्रवाह ओलांडून गेलीं. त्यांचे खूर लागून काळविटाची पाठ रक्तबंबाळ झाली. पाठीच्या कण्यापर्यंत मांस दिसूं लागलें. तो मूर्च्छित पडण्याच्या बेतांत आला. शेवटीं एक हरणाचें बछडें राहिलें होतें. वेळ अगदीं आणीबाणीची होती. जरा उशीर झाला असता तर शिकाऱ्याचा बाण त्या बछड्याच्या उरांत घुसला असता. काळविटानें डोळे घट्ट मिटून त्याला पाठीवरून प्रवाह ओलांडण्यास सांगितलें. बछड्यानें त्याप्रमाणें केल्यावर तें सुरक्षित स्थळीं पोचलें. पण झालेल्या वेदनांनीं काळवीट गतप्राण झाला! आपल्या समाजाकरितां आपण देहत्याग केला पाहिजे हें तत्त्व या जन्मांत बुद्धदेव शिकला.

बुद्धदेव माकडाच्या जन्मांत असतांना त्याच्या बरोबरचीं सुमारें पांचशें माकडें एका गांवाजवळील मळ्यांत चिंचा खाण्यास गेलीं. बुद्धानें त्यांना पुष्कळ सांगितलें. तीं रानांतलीं चिंचेचीं झाडें असतीं तर ठीक होतें, कारण त्यांवर मग

कुणाची मालकी नसती असें बुद्ध म्हणाला. पण माकडेंच तीं ! आपल्या एखाद्या शहाण्या बांधवाचा उपदेश थोडाच ऐकणार ! गांवांत ही बातमी कळली तेव्हां गांवकरी सोटे घेऊन तिकडे गेले. आतां आपल्या सोबत्यांना चोप बसणार असें बुद्धाला कळून चुकलें. तेव्हां गांवांत एकच म्हातारी राहिली होती. तिच्या घराला बुद्धानें आग लावून दिली. ती 'घर पेटलें. विजवा हो कोणी !' असें ओरडत सुटली. तेव्हां सोटे घेऊन माकडांचा खरपूस समाचार घ्यायला निघालेले सर्व गांवकरी परतले. अशा रीतीनें बुद्धानें आपल्या सोबत्यावरचें संकट टाळलें. या जन्मांत चातुर्याची परमावधि बुद्धानें गांठली.

एका जन्मांत प्रयत्नाची शिकस्त करण्याची वृत्ति त्यानें मिळविली. त्या जन्मांत बुद्धदेव मांजर झाला होता. मांजराचें एक पिलूं नदींत बुडूं लागलें. तेव्हां बुद्ध आपल्या शेपटानें नदींतलें पाणी सपासप उपसूं लागला. तेव्हां इंद्र तेथें येऊन त्याला म्हणाला, "अरे, मूर्ख मांजरा, ही नदी तुझ्या या प्रयत्नानें कल्पान्तापर्यंत तरी रिती होईल काय ? तूं हें पोर कसें वांचविणार ?" तेव्हां बुद्धानें उत्तर दिलें, "दुसऱ्याचा नाहक पाणउतारा करण्यांत पटाईत दिसतोस तूं ! अरे, अगदीं थोडी आशा असली तरी प्राण्यानें धीर न सोडतां प्रयत्न करीत राहावेत." इंद्र या उत्तरानें संतुष्ट झाला आणि त्यानें तें मांजराचें पोर बाहेर काढून दिलें. जे स्वतः प्रयत्न करतात त्यांनाच देव मदतनीस होतो हेंहि तत्त्व या कथेंत गोवलें आहे.

बुद्ध ( किंवा बोधिसत्त्व ) एकदां बैलाच्या जन्माला गेला. हा पुष्ट व गरीब बैल एका म्हातारीनें पाळला होता. म्हातारीनें त्याचें संगोपन मोठ्या प्रेमानें केलें. पुढें म्हातारी अगदीं जख्खड होऊन तिच्यानें काम करवेना. बैलाला वाटलें आजवर हिनें आपलें प्रेमानें पालनपोषण केलें तर आपणहि हिच्या चरितार्थासाठीं कांहीं केलें पाहिजे. हा विचार करीत तो नदीकांठीं चरत होता. इतक्यांत पांचशें गाड्या घेऊन एक व्यापारी तेथें आला. त्याचे बैल थकले होते. नदींत गाळ होता. तो म्हणाला, "एखादा धष्टपुष्ट बैल माझ्या जनावरांना मदत करून या गाड्या पुढें काढून देईल तर त्याला प्रत्येक गाडीमागें मी रुपया



सतलजगंज
येथील बुद्धमूर्ति

देईन. " बोधिसत्त्वानें तें ऐकलें. तो पुढें गेला आणि व्यापाऱ्याच्या आसपास चरूं लागला. हा चांगला पहाडासारखा बैल आहे याला कामाला लावण्यास कांहीं हरकत नाहीं. व्यापाऱ्यानें बोधिसत्त्वाला पकडून त्याच्याकडून काम करून घेतलें. व्यापारी फार प्रामाणिक होता. त्यानें बुद्धाच्या गळ्यांत पिशवी बांधली आणि प्रत्येक गाडीचा एक रुपया याप्रमाणें पांचशें रुपये त्या पिशवींत टाकले. बुद्ध आनंदानें परत घरीं आला. त्याच्या गळ्यांत पांचशें रुपयांचा ऐवज पाहून म्हातारीच्या क्षीण डोळ्यांत आनंदाश्रु उभे राहिले ! तिनें त्याला पाणी तापवून अभ्यंगस्नान घातलें आणि भरपूर वैरण दिली. ते पैसे ती म्हातारी व बैल यांना अखेरपर्यंत पुरले. कृतज्ञता व कारुण्य यांचे धडे या जन्मांत बुद्ध शिकला.

ऐरावताची कहाणी तर फारच रमणीय आहे. या जन्मांत हिमालयाच्या पायथ्याशीं एका सुंदर व निबिड जंगलांत बुद्धदेव ऐरावत म्हणून जन्माला आला. ऐरावत म्हणजे पांढरा हत्ती. ऐरावताची जात मुळांतच डौलदार व देखणी. त्यांत या प्राण्याला पूर्णचंद्रासारखें देखणेंपण लाभलें होतें. हा आणि याची वृद्ध आई ऐरावतांच्या कळपांत राहात असे. आईसाठीं बुद्ध गोडगोड कंदमुळें आणून देई; पण पुढें त्याला असें दिसून आलें कीं आईला तीं मिळत नाहींत. कारण आप्पलपोटे ऐरावत तीं कंदमुळें तिच्यापासून हिसकावून घेत आणि मटकावून टाकीत. बुद्धाला वाईट वाटलें. मग एके दिवशीं रात्रीं तो आपल्या आईला घेऊन त्या जंगलांतून दुसरीकडे पसार झाला आणि आपल्या आईसह सुखानें राहूं लागला.

एकदां काय झालें ? आपल्या आइकरितां कंदमुळें आणण्यास बुद्ध बाहेर पडला असतां त्याला एके ठिकाणीं कुणाचा तरी आक्रोश ऐकूं आला. पाहतों तों एक माणूस विव्हळत पडला आहे. ऐरावतानें जवळ जाऊन चौकशी केली तेव्हां त्याला असें कळलें कीं हा माणूस सात दिवस जंगलांत अन्नपाण्यावांचून हिंडतो आहे. पण त्याला आपल्या नगरीचा रस्ता सांपडत नाहीं. बुद्धानें त्याला आपल्या पाठीवर घेतलें आणि जंगलाबाहेर त्या नगरीच्या वाटेवर सोडून दिलें.

पण कुणावर उपकार करायला जावें आणि तो उपकारच आपल्यावर उलटावा तसें झालें. तो माणूस आपल्या नगरींत गेला तेव्हां राजानें तेथें दवंडी पिटविली होती कीं, 'राजाच्या स्वारीला शोभेसा हत्ती कुणाला आढळल्यास त्यानें राजवाड्यांत वर्दी द्यावी.' हा माणूस राजवाड्यांत गेला आणि राजाला म्हणाला, "महाराज, हिमालयाच्या पायथ्याशीं असलेल्या अरण्यांत एक फारच उत्कृष्ट ऐरावत आहे. पर्वता-सारखा भव्य, दुधासारखा शुभ्र, जलप्रपातासारखा वेगवान्. तो आपल्या ऐश्वर्याला शोभण्यासारखा आहे." राजानें लगेच माणसें पाठवून त्या ऐरावताला पकडून आणलें आणि आपल्या स्वारीचा मुख्य म्हणून हत्तीखान्यांत मोठ्या बडदास्तीनें ठेवलें. पण हा मातृभक्त ऐरावत दिवसेंदिवस खंगत चालला. स्वारीच्या वेळीं त्याच्या डोळ्यांतून पाणी वाहूं लागे. अखेर राजानें ऐरावताच्या खिन्नतेचें कारण शोधून काढलें. आपली वृद्ध माता कोणत्या स्थितींत काळ कंठीत असेल, तिची काळजी कोण घेत असेल, आपल्या काळजीनें तिचा क्षणहि अश्रूंवांचून जात नसेल या विचारांमुळें ऐरावताला राजाच्या हत्तीखान्यांतलें सुग्रास अन्न गोड लागेना. अखेर राजानें सेवकांना सांगितलें, 'हा ऐरावत जेथून आणला तेथें तो सोडून द्या. त्याच्या आईच्या सेवेंत त्याला सुख आणि आनंद मिळूं द्या.' ऐरावत आल्या वाटेनें स्वस्थळीं पोंचला. त्याच्या मातेला किती आनंद झाला याची कल्पनाच करणें बरें! शब्दांनीं त्याचें काय वर्णन करतां येणार?

ज्या यज्ञसंस्थेचा बुद्धदेवानें निषेध केला तिच्याविरुद्ध मोहीम त्यानें अगोदरच एका जन्मांत काढली होती. निरपराधी पशूंची हत्या करून स्वर्ग मिळवूं पाहणारे वैदिक ब्राह्मण बुद्धदेवाला मूर्ख वाटत. काशी येथें ब्रह्मदत्त नांवाचा राजा राज्य करीत असतां बोधिसत्त्व एका धर्मनिष्ठ ब्राह्मणाच्या कुलांत जन्माला आला. त्याचीं माता-पितरें तो लहान असतांच मरण पावलीं. तेव्हां आपली सर्व जिंदगी दानधर्मांत खर्च करून बोधिसत्त्व हिमालयांत निघून गेला. तेथें विरक्त वृत्तीनें तो यतीचें जीवन घालवूं लागला.

एकदां ब्रह्मदत्त राजा मध्यरात्रीं आरामशीर झोंपला असतां विचित्र आवाज होऊन त्याला जाग आली. पहिल्यानें त्यानें आपल्या बागेंतल्या बगळ्याचा

कर्कश स्वर ऐकला. नंतर नगारखान्यावरून एक कावळा काव काव करीत गेला. कोकिळा ओरडली, बागेंतलें हरिण व माकड हे पाळीव प्राणीसुद्धां कसला तरी शब्द काढूं लागले. हा शब्द मनाला अस्वस्थ करणारा होता. मध्यरात्रीची वेळ असल्यानें त्या शब्दांचा भेसुरपणा विशेष जाणवत होता. दुसऱ्या दिवशीं राजानें जाणत्या पुरोहितांना बोलाविलें आणि मध्यरात्रीचा प्रकार सांगितला. ते लोक निमित्तालाच टेकलेले. कांहीं तरी निमित्त काढून यज्ञ करायचा आणि त्यांत मांसान्नावर यथेच्छ ताव मारायचा हें त्यांचें धोरण असे. तेव्हां या लोकांनीं सांगितलें, " राजा हीं सर्व दुश्चिन्हें आहेत. देवांचा तुझ्यावर कोप झाला आहे. यज्ञ केला पाहिजे. " वेदमूर्तींची आज्ञा ती. भाविक राजानें लगेच यज्ञाची सिद्धता केली. अनेक पशु बळी देण्यासाठीं जमविले.

याच वेळीं यति बोधिसत्त्व हिमालयांतून उतरून काशीस थोडे दिवस मुक्कामास आला होता. त्याच्या शिष्यांपैकीं एकाला राजा यज्ञाची तयारी करीत आहे हें कळलें. शिष्याचें मन द्रवलें आणि त्यानें बोधिसत्त्वाला ही हकीकत सांगितली. बोधिसत्त्व तडक राजाकडे गेला आणि राजाला म्हणाला, " राजा, यज्ञ करण्याचा विचार तूं सोडून दे. तूं मध्यरात्रीं जे आवाज ऐकलेस त्यांत अनैसर्गिक, विचित्र, किंवा अशुभ असें कांहींच नाहीं. बगळा ओरडला. कारण त्याला छोटया तलावांत पाणी मिळालें नाहीं. तो तलाव कोरडा ठणठणीत होता. कावळा कां ओरडला ठाऊक आहे ? त्यानें नगारखान्याच्या भिंतीवर घरटें बांधलें होतें. त्याच्या मादीनें घातलेलीं अंडीं त्यांत होतीं; पण तुझ्या माहुतानें बेगुमानपणें हत्ती तेथून नेला तेव्हां त्याचें घरटें अंड्यासह खालीं आलें ! कावळ्यानें मग कां आक्रोश करूं नये बरें ! कोकिळा हरण यांना तुझ्या पिंजऱ्यांतलें बंदिस्त जीवन आवडत नाहीं. तें बिचारें माकड ! स्वैरपणें आनंदांत रानोमाळ या झाडावरून त्या झाडावर उड्या मारीत असायचें. तुझ्या उद्यानांतल्या एवढ्याशा पिंजऱ्यांत एका दांडीवर आडव्यातिडव्या उड्या मारून त्याला समाधान मानून घ्यावें लागतें. मग या प्राण्यांच्या तोंडून करुण व कर्कश शब्द बाहेर पडला तर आश्चर्य कसलें ? त्यासाठीं यज्ञ कशाला आणि एवढ्या पशुवधाचें प्रयोजन काय ? "

राजाला बुद्धदेवाचें बोलणें पटलें. त्यानें सर्व मुक्या प्राण्यांना बंधमुक्त केलें आणि यज्ञासाठीं जमवून ठेवलेले सारे पशु सोडून दिले. त्या मुक्या प्राण्यांनीं मनांतून बोधिसत्त्वाला किती बरे धन्यवाद दिले असतील !

आपणांजवळ जें सत्त्व आहे तें कुठल्याहि लोभाला बळी पडून सोडूं नये हें तत्त्व बोधिसत्त्व एका वैश्यकुलांत जन्म घेऊन शिकला. बोधिसत्त्वाजवळ त्या वेळीं पांचशें गाड्या माल होता. तो घेऊन व्यापारासाठीं बुद्ध जात असतां दुसऱ्या एका वैश्यपुत्राशीं त्याची गांठ पडली. हा वैश्यपुत्र आळशी, चैनी व मूर्ख होता. त्याच्याजवळहि पांचशें गाडया सामान होतें. दोघांनींहि आपापले तांडे घेऊन एकदम जाऊं नये, असें त्याला म्हटलें. हें त्याला पटलें. पण अधीरपणें तो आपल्या गाडया घेऊन पुढें निघाला.

वाटेनें पाण्याचें दुर्भिक्ष एखाद्या भागांत झाल्यास सोय असावी म्हणून पाण्याच्या पखाली त्या वैश्य पुत्रानें भरून घेतल्या होत्या. कांहीं वाट चालून गेल्यावर एक तांडा त्याला भेटला. तो राक्षसाचा होता. या राक्षसांनीं मायावी रूपें धारण केलीं होतीं. त्यांच्यावरोबरच्या सेवकांजवळ फुलें होतीं; तीं टवटवींत दिसत होतीं. त्यांचे कपडे भिजले होते. वैश्यपुत्र वेंधळाच होता. त्यानें राक्षसांना विचारलें, " का हो पुढें आम्ही जात आहों त्या प्रदेशांत भरपूर पाणी दिसतें. " राक्षस म्हणाले, " तर. तेथूनच आलों ना आम्ही. तेथें बरसात सुरू आहे. " वैश्यपुत्रानें विचार केला इतकें पाणी असेल तर पाण्याच्या पखालींचें ओझें कशाला ? त्यानें त्या पखाली ओतून टाकल्या आणि तो पुढें जाऊं लागला. तों काय ? अनुभव विपरीत आला. सारें वाळवंट होतें. डोळ्यांला लावूं म्हटलें तर पाण्याचा थेंब नव्हता ! उन्हानें भयानक वणवा पेटला होता, पाण्यावांचून गुरें-माणसें तडफडूं लागलीं. रात्र पडली. वैश्यपुत्र, त्याचीं माणसें व जनावरें ' पाणी ! पाणी ! ' करीत मरून पडली ! ते राक्षस परत आले आणि रात्रीं त्यानीं त्या प्रेतांवर यथेच्छ ताव मारला !

सुमारें महिन्यानें वोधिसत्त्व आपला तांडा घेऊन निघाला. त्यालाहि ते

राक्षस भेटले. बोधिसत्त्वानेंहि आपल्याबरोबर पाण्याच्या पखाली घेतल्या होत्या. राक्षस म्हणाले, "अहो, आपण जात आहां त्या प्रदेशांत भरपूर पाणी आहे! ही पाहा आमची चीजवस्त सारी भिजून गेली आहे. पखाली टाका ओतून." पण बुद्धानें विचार केला कीं जर त्या बाजूला पाऊस असता तर ढग दिसले असते, विजा चमकल्या असत्या. पण तसें चिन्ह ज्या अर्थीं दिसत नाहीं त्या अर्थीं तिकडे पाऊस नसावा. आपलें पाणी टाकून देण्याचा मूर्खपणा करण्यांत काय अर्थ आहे? आणि त्यानें त्या पखाली तशाच ठेवल्या. वाळवंटाचा प्रदेश आला. तेव्हां त्या पखालींचा अर्थात् उपयोग झाला. बरोबरीचीं माणसें व जनावरें यांना थकवा आला नाहीं. त्या ठिकाणीं अगोदर गेलेल्या वैश्यपुत्राचे लोक व जनावरें यांचीं हाडें पडलेलीं दिसत होतीं! तेव्हां येथें धोका आहे म्हणून रात्रीं बुद्धदेव व त्यांचीं माणसें जागत बसलीं. राक्षस आले. पण बुद्ध जागरूक असल्यानें त्यांचें कांहींच चाललें नाहीं. आपलें सत्त्व कुठल्याहि मोहाला बळी न पडतां संग्रहीं ठेवावें, त्याची फारकत करूं नये हें तत्त्व या जन्मांत बुद्धदेव शिकला.

अशा किती कथा सांगाव्या? साऱ्याच बोधप्रद आहेत. अशा रीतीनें जन्मचे जन्म साधना केली तेव्हां अखेरच्या जन्माला त्याला बुद्धत्व आलें. तो योग्याचा योगी, संतांचा संत आणि उपदेशकांचा उपदेशक झाला.





# ८. निर्वाण

बुद्धदेवाचा जीवनसूर्य आतां मावळतीकडे कलला होता. तो आतां ८० च्या घराला आला. धर्मसाक्षात्कार झाल्यापासून सुमारें पंचेचाळीस वर्षें सतत संचार करीत त्यानें आपल्या नवीन धर्माचा उपदेश केला. यज्ञयागाचें बंड कमी झालें, हिंसेला आळा पडला, जातिभेदाची तीव्रता कमी झाली, सामान्य लोकांना उदात्त जीवनाचा मार्ग कळला. आतां आपला अवतार संपविण्यास हरकत नाहीं असें त्याला वाटूं लागलें. आणि हा विचार त्यानें आपला पट्टशिष्य आनंद याला बोलून दाखविला. " आनंदा, मी आतां ऐंशी वर्षांचा झालों. मोडक्या खटाऱ्याप्रमाणें माझा देह झाला आहे. आतां मला हें जग सोडलेंच पाहिजे. " आनंद उद्विग्न झाला तेव्हां बुद्धदेवानें त्याचें समाधान केलें.

मगध देशाजवळ वज्जी लोकांचें प्रजासत्ताक राज्य होतें. निरनिराळ्या सातशें गांवांतले प्रमुख गृहस्थ एकत्र येऊन हें राज्य चालवीत. हीं माणसें इतकीं

शहाणीं, सद्वर्तनी आणि न्यायी होतीं कीं वज्जी लोकांचा हा प्रदेश म्हणजे एक आदर्श राज्य गणिलें जाई. प्रजा सुखी व संतुष्ट होती. पण कुणी शांततेनें व निरुपद्रवीपणानें आपला जीवनक्रम चालवीत असेल तर असंतुष्ट सत्ताधाऱ्यांना तें आवडत नाहीं. मगध देशाचा राजा अजातशत्रु याला या वज्जी लोकांचा हेवा वाटूं लागला. हा प्रदेश स्वारी करून आपल्या राज्याला जोडून टाकण्याचें मगधाधिपतीनें ठरविलें. वर्षाकार म्हणून मगधाचा एक मंत्री होता. तो मोठा न्यायी व चतुर होता. त्यानें हळूच राजाला म्हटलें, "महाराज, वज्जी लोकांवर स्वारी करण्यापूर्वी आपण भगवान् बुद्धदेवाचा सल्ला घ्यावा. भगवान् सध्यां गृध्रकूट पर्वतावर रहात आहे." राजानें तें मान्य केलें आणि वर्षाकाराकडेच तें काम सोपविलें. वर्षाकार बरोबर सरंजाम घेऊन गेला आणि बुद्धदेवाला प्रणिपात करून त्यानें अजातशत्रूचा बेत कळविला. मात्र शब्दयोजना अशी कुशलतेनें केली कीं बुद्धदेवानें आपलें मत सांगावें. तेव्हां बुद्धदेव म्हणाला, "वज्जी लोक जोंपर्यंत नगरभवनांत सभा भरवून एका विचारानें वागत आहेत, जोंपर्यंत पूर्वीच्या सगळ्या चालीरीती सोडून नव्या चालीरीती ते समाजांत घुसडूं पाहात नाहींत व समाजांत क्रांति करण्याची खटपट करीत नाहींत, जोंपर्यंत प्राचीन व्यवस्थेला अनुसरून त्यांचें वर्तन आहे. जोंपर्यंत ते म्हाताऱ्या माणसांचा मान ठेवीत आहेत. त्यांची सेवा करीत आहेत, आणि त्यांची सल्लामसलत घेत आहेत; जोंपर्यंत ते कुलीन स्त्रियांना घराच्या चार भिंतींत कोंडून ठेवीत नाहींत, त्यांना तुच्छ समजत नाहींत आणि त्यांच्यापुढें आपल्या शक्तीचें प्रदर्शन करीत नाहींत; जोंपर्यंत देशांतल्या धर्मसंस्कारांचा ते आदर करीत आहेत; जोंपर्यंत ते साधुसंतांचा परामर्ष घेत आहेत. तोंपर्यंत त्यांना परचक्रांचें भय नाहीं." देशाचें खरें बळ त्यांतले लोक संघटित, शिस्तबद्ध, उद्योगी व श्रद्धाळू असण्यावर असतें हें नागरिकशास्त्र बुद्धदेवानें किती थोडक्यांत सांगितलें तें पाहण्यासारखें आहे. हा उपदेश ऐकल्यावर वर्षाकार काय समजावयाचें तें समजला आणि निघून गेला.

यानंतर बुद्धदेवानें आपल्या शिष्यांचा मेळावा बोलाविला, दूर जवळ असणाऱ्या झाडून साऱ्या प्रमुख शिष्यांना निमंत्रणें गेलीं. आतां आपला निधनकाल

समीप आला आहे तेव्हां संघाची व्यवस्था नीट करून ठेविली पाहिजे असें त्यानें ठरविलें. सर्व शिष्य जमल्यावर बुद्धदेव गंभीर वाणीनें त्यांना म्हणाला—

"भिक्षूंनो, जोंपर्यंत तुम्ही सगळे एकदिलानें जमत जाल, जोंपर्यंत एकविचारान व एकदिलानें संघाचें धर्मकार्य पार पाडण्याविषयीं कळकळ बाळगाल; जोंपर्यंत संघाच्या अध्यक्षाला पित्याप्रमाणें मान देऊन त्याच्या आज्ञेंत राहाल; जोंपर्यंत वासनांपासून तुम्ही अलिप्त असाल आणि फुकटची बडबड करणार नाहीं; जोंपर्यंत झोपाळू न होतां धर्मसाधनाविषयीं तुम्ही जागरूक राहाल; जोंपर्यंत पापाच्या इच्छेला तुम्ही बळी पडणार नाहीं आणि पापी लोकांची मैत्री करणार नाहीं; जोंपर्यंत इतर सर्व गोष्टी सोडून तुम्ही निर्वाणाच्याच मागें लागाल तोंपर्यंत तुम्हांला कसलेंहि भय नाहीं."

ह्या उपदेशाचा विस्तार करून बुद्धदेवानें त्यांना आचारधर्म सांगितला आणि तो नालंदा विद्यापीठांत गेला. हें प्रसिद्ध विश्वविद्यालय होतें. साऱ्या भारतांतून येथें धर्मज्ञान शिकण्याकरितां विद्यार्थी येत. बुद्धानें या ठिकाणच्या सर्व छात्रांना धर्मोपदेश केला. पुढें ईशान्य दिशेस अनेक गांवें घेत घेत तो पावा नगरास आला.

या ठिकाणीं चुंद नांवाचा एक बुद्ध शिष्य राहात होता. आपला महान् गुरु आपल्या गांवीं आला आहे हें ऐकतांच त्याला आनंद झाला. बुद्धदेवाचें दर्शन घेऊन त्यानें शिष्यांसह आपल्या घरीं भोजनास येण्याचें आमंत्रण बुद्धदेवाला दिलें. बुद्धानें तें आनंदानें मान्य केलें. चुंद लोहार होता. पण बुद्धदेव भक्तीपुढें कसलीच जात मानीत नसे. गुरु भोजनास येणार म्हणून आपल्या शक्तीप्रमाणें चुंदानें मेजवानीचा मोठा थाट केला होता. सर्व शिष्य बसले. गुरूजवळ चुंद एक पान घेऊन त्याचा उपदेश ऐकण्यास बसला.

पण जेवणांत कांहीं पदार्थ विषारी लागला म्हणून म्हणा किंवा अन्य कारणानें म्हणा, जेवण होतांच बुद्धदेवाची प्रकृति बिघडली! त्याच्या पायांत त्राण राहिलें नाहीं! नदीकांठीं येऊन तो एका झाडाखालीं स्वस्थ पडला आणि

आनंदाला पाणी आणण्यास त्यानें सांगितलें. नदींतून नुकताच शेंकडों हत्तीचा तांडा गेला असल्यानें नदीचें पाणी अगदीं गढूळ झालें होतें. तें जरा स्वच्छ होण्याची आनंद वाट पाहात होता. पण बुद्धदेवाच्या गळ्याला शोष पडला होता म्हणून त्यानें पाणी आणण्यासाठीं आनंदाला वारंवार सांगितलें. आनंद नाइलाजानें भांडें घेऊन नदीपाशीं आला, तों काय चमत्कार ? एखाद्या डोंगरामध्यें काळ्या भोर पाषाणांत जसें स्फटिकासारखें पाणी असावें तसें तें नदीचें पाणी झालें होतें. आपल्या गुरूच्या प्रभावाची आनंदाला धन्यता वाटली. निर्मळ पाणी पिऊन थोडी हुशारी आल्यावर बुद्धदेव थोडा पुढें सरकला आणि तशाच क्षीण अवस्थेंत मजल दर मजल करीत तो कुसिनार नगराला आला. या नगरीजवळील शालवनांत आनंदानें गुरूकरितां एक आसन तयार केलें. त्यावर बुद्धदेवानें आपला देह टाकला. ज्या दोन शालवृक्षांच्या मधोमध आसन तयार करण्यांत आलें होतें त्यांना अकस्मात् मोहोर आला; मोहोराचीं फुलें होऊन बुद्धदेवाच्या अंगावर पडलीं. अंतराळांत संगीत ऐकूं येऊं लागलें.

बुद्धदेवाचे अंताचे क्षण जवळ येत चालले होते. आनंदाला तें दृश्य पाहावेना. त्याची गुरूवर अपरंपार भक्ति होती. एकीकडे जाऊन आनंद रडत बसला. बुद्धदेवानें विचारलें, " आनंद कुठें आहे ? त्याला बोलवा. " आनंद आल्यावर त्याची समजूत घालीत बुद्धदेव म्हणाला, " आनंदा, वेड्यासारखा शोक करूं नकोस. प्रियतम वस्तूचा वियोग हा केव्हां तरी होणारच. यापेक्षां अन्य कांहीं होणें कसें शक्य आहे बरें ! तूं अनेक वर्षें माझी उत्तम सेवाचाकरी केलीस, तुझें जीवन सत्कृत्यांनीं भरलेलें. तूं मोक्षमार्गाचा खरा अधिकारी आहेस. " नंतर आपल्या निर्वाणाची वेळ जवळ आली असें कुसिनारच्या नागरिकांना सांगण्यासाठीं त्यानें आनंदाला गांवांत पाठविलें.

बुद्ध महात्मा आतां एका रात्रीचा सोबती आहे ही वार्ता कळतांच कुसिनारचे लोक फार दुःखी झाले. स्त्रियांनीं हंबरडे फोडले; मुलें रडूं लागलीं. मोठीं माणसें निःश्वास टाकूं लागलीं. सर्वजण शालवनांत येऊन बुद्धदेवाभोंवतीं जमले.

इतक्यांत सुभद्र नांवाचा एक ब्राह्मण तेथें आला. बौद्ध धर्माविषयीं त्याला कांहीं शंका होत्या आणि बुद्धदेवाकडून त्यांचें निरसन करून घ्यायचें होतें. पण आनंद म्हणाला, ‘ भगवान् व्याधिग्रस्त आहेत. त्यांना आतां त्रास देणें इष्ट नाहीं. ’ पण बुद्धदेवाला हें कळल्यावर त्यानें सुभद्राला जवळ बोलावलें आणि तशा स्थितींतहि त्याच्या शंकांचें निरसन केलें.

सुभद्र सद्गदित झाला. साष्टांग प्रणिपात करून तो बुद्धदेवाला म्हणाला, “ महाराज, अंधारांत प्रकाश



बुद्धाच्या महापरिनिर्वाणानंतर त्याचा शिष्य आनंद त्याचे शेजारीं उभा आहे. ( सीलोन )

दाखवावा त्याप्रमाणें आपण मला सन्मार्ग दाखविला." तो बौद्धसंघांत प्रविष्ट झाला. बुद्धदेवानें आपल्या जीवनांत दीक्षा दिलेला हा शेवटचाच भिक्षु होय.


कुणाला कांहीं शंका असल्यास त्यानें ती विचारावी असें बुद्धदेवानें म्हटलें. या वेळीं वैशाख शुद्ध पौर्णिमेचा दुसरा प्रहर सुरू झाला होता. सर्वजण स्तब्ध होते. कुणी कांहीं बोललें नाहीं. अखेर बुद्धदेव म्हणाला, "सर्व वस्तु निरनिराळ्या द्रव्यांच्या संयोगानें झाल्या असून त्या नाश पावणाऱ्या आहेत. म्हणून प्रत्येकानें समाधानी चित्तानें आपापलें कर्तव्य करीत राहावें." हेच त्याचे शेवटचे शब्द. यानंतर तो ध्यानमग्न झाला आणि थोड्याच अवकाशांत निजधामास गेला.

नमो बुद्धाय।

संग्रहालय
अनुक्रम
विभाग
क्रमांक
नों. दि.



बुद्धदेवाचें महापरिनिर्वाण ( अजंठा )



बुद्धजीवनपट ( सारनाथ )

IRBK-0105787



